**प्रकल्प प्रवर्तक मे. जेएसड्ब्लु इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड जेएसड्ब्लु सेंटर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र यांचा मुरबे, तालुका आणि जिल्हा-पालघर येथे प्रस्तावित मुरबे बंदर विकासासाठी प्रकल्प प्रवर्तक यांना महाराष्ट्र सागरी मंडळ (Maharashtra Maritime Board) यांनी प्रदान केलेल्या इरादा पत्रानुसार (Letter of Intent) सर्व हंगामात कार्यक्षम, ग्रीनफिल्ड, मल्टिकार्गो खोल पाण्यातील बंदर (All Weather Multi Cargo Greenfield Deep Water Port), भौगोलिक स्थान - सातपाटीखाडीच्या उत्तर भागात (अक्षांश १९° ४७' ३३.६५" उत्तर, रेखांश ७२° ४१' १८.८८" पूर्व) आणि अक्षांश १९° ४३'५०.६०" उत्तर, रेखांश ७२° ४१' ४८.८०" पूर्व) -एकूण १६ बर्थ आणि २ पोर्ट क्राफ्ट बर्थ सुमारे १३४.०७ दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष (एमएमटीपीए) घन व द्रव माल हाताळणी क्षमता विकसित करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. जेएसड्ब्लु इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, जेएसड्ब्लु सेंटर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र यांचा मुरबे, तालुका आणि जिल्हा-पालघर येथे प्रस्तावित मुरबे बंदर विकासासाठी प्रकल्प प्रवर्तक यांना महाराष्ट्र सागरी मंडळ (Maharashtra Maritime Board) यांनी प्रदान केलेल्या इरादा पत्रानुसार (Letter of Intent) सर्व हंगामात कार्यक्षम, ग्रीनफिल्ड, मल्टिकार्गो खोल पाण्यातील बंदर (All Weather Multi Cargo Greenfield Deep Water Port), भौगोलिक स्थान - सातपाटी खाडीच्या उत्तर भागात (अक्षांश १९° ४७' ३३.६५" उत्तर, रेखांश ७२° ४१' १८.८८" पूर्व) आणि अक्षांश १९° ४३' ५०.६०" उत्तर, रेखांश ७२° ४१' ४८.८०" पूर्व) - एकूण १६ बर्थ आणि २ पोर्ट क्राफ्ट बर्थ सुमारे १३४.०७ दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष (एमएमटीपीए) घन व द्रव माल हाताळणी क्षमता विकसित करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सोमवार दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता वाजता जिल्हा क्रिडा संकुलाचे मैदान, सोनोपंत दांडेकर कॉलेजजवळ, कॉलेज रोड, टेंभोडे, तालुका, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. विरेन्द्र सिंह, उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर, तालुका, जिल्हा-पालघर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. इंदु राणी जाखड, भाप्रसे, जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. किरण हसबनीस, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर

जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर कार्यालय यांच्यातर्फे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचना व दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या सुधारित अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. जेएसड्ब्लु इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, जेएसड्ब्लु सेंटर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र यांचा मुरबे, तालुका आणि जिल्हा-पालघर येथे प्रस्तावित मुरबे बंदर विकासासाठी प्रकल्प प्रवर्तक यांना महाराष्ट्र सागरी मंडळ (Maharashtra Maritime Board) यांनी प्रदान केलेल्या इरादा पत्रानुसार (Letter of Intent) सर्व हंगामात कार्यक्षम, ग्रीनफिल्ड, मल्टिकार्गो खोल पाण्यातील बंदर All Weather Multi Cargo Greenfield Deep Water Port), भौगोलिक स्थान - सातपाटी खाडीच्या उत्तर भागात (अक्षांश १९⁰ ४७' ३३.६५" उत्तर, रेखांश ७२⁰ ४१' १८.८८" पूर्व) आणि अक्षांश १९⁰ ४३' ५०.६०" उत्तर, रेखांश ७२⁰ ४१' ४८.८०" पूर्व) - एकूण १६ बर्थ आणि २ पोर्ट क्राफ्ट बर्थ सुमारे १३४.०७ दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष (एमएमटीपीए) घन व द्रव माल हाताळणी क्षमता विकसित करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक ११.०८.२०२५ रोजीचा अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग ए - अनुसूची ७ (ई) पोर्टस्, हार्बर्स, ब्रेकवॉटर्स, ड्रेजिंग अंतर्गत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २४.०४.२०२५ रोजी सादर केला व त्यास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ११.०६.२०२५ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण डिसेंबर 2024 ते फेब्रुवारी 2025 या तीन महिन्याच्या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर-२, एमआयडीसी वसाहत परिसर, पोस्ट-टीएपीपी, बोईसर (पश्चिम), तालुका, जिल्हा -पालघर - ४०१ ५०४ यांनी पत्र दिनांक ११.०८.२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, पालघर यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरण विषयक जनसुनावणी सोमवार, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा क्रिडा संकुलाचे मैदान, सोनोपंत दांडेकर कॉलेजजवळ, कॉलेज रोड, टेंभाडे, तालुका, जिल्हा- पालघर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई- ६६ / २०२५, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२५०९१०-एफटीएस-०२२०, दिनांक १०-०९-२०२५ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, पालघर, **-अध्यक्ष**

VH

किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी – प्रादेशिक अधिकारी – ठाणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे — **–सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बोईसर (पश्चिम), तालुका, जिल्हा-पालघर — **–आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, एमआयडीसी वसाहत परिसर, पोस्ट-टीएपीपी, बोईसर (पश्चिम), तारापूर, तालुका, जिल्हा-पालघर-४०१ ५०४, महाराष्ट्र यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र "दैनिक लोकमत" यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र "फ्री प्रेस जर्नल" यात इंग्रजीत दिनांक ०३ सप्टेंबर, २०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती.

तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified)/ कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

| | |
|---|---|
| १ | प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१ |
| २ | मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, पालघर, |
| ४ | उप-विभागीय दंडाधिकारी, पालघर, जिल्हा-पालघर, |
| ५ | संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२. |

| | |
|---|---|
| ६ | मुख्य प्रबंधक, जिल्हा उद्योग केंद्र, मध्यवर्ती कार्यालय, जिल्हा-पालघर, |
| ७ | सहसंचालक (जप्रनि), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२ |
| ८ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे |
| ९ | उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रणमंडळ, एमआयडीसी वसाहत परिसर, पोस्ट-टीएपीपी, बोईसर (पश्चिम), तालुका, जिल्हा-पालघर-४०१ ५०४, महाराष्ट्र |
| १० | तहसीलदार, तहसील कार्यालय, पालघर, जिल्हा-पालघर, |
| ११ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, पालघर, जिल्हा-पालघर, |
| १२ | मुख्याधिकारी, पालघर नगरपरिषद, तालुका-पालघर, जिल्हा-पालघर, |
| १३ | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय - आलेवाडी, बेटेगाव, बिरवाडी, चहाडे, दांडी, दापोली, नवी देलवाडी, धनसार, घिवली, गिरनोळी, गुंदले, कुरगाव, काटाळे, खैरापाडा (बोईसर), कोकणेर, कोलवडे, कोळगाव, मासवण, मोरेकुरण, मुरबे, नांदगाव तर्फे तारापूर, नवापूर, पडघे, पाम, पाम टेंभी, पथराळी, सागावे, सालवड, सरावली, सातपाटी, शिरगाव, उच्छेळी, उमरोळी, उनभाट, वेंगणी, परनाळी |
| १४ | ग्रामपंचायत अधिकारी, गटग्रामपंचायत कार्यालय -अंबाडी/शेलवाली, बोईसर/ दांडीपाडा/ काचकरपाडा, देवखोप/ नंडोरे, कमारे/ वरखुंटी/ टोकराळे, खारेकुरण/ विकासवाडी, कुंभवली/ एकलारे, मान/ कल्लाळे/ वारागंडे/ कांबळगाव, शिगांव/ खुताड/सुमडीपाडा/ वसरोली/खरशेत/वाकडी, पंचाळी/आगवण |
| १५) | संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई - मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे |

त्याचप्रमाणे सदरहू पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीबाबत स्मरण सूचना (Reminder Notice) दिनांक ०१-१०-२०२५ रोजी स्थानीक वृत्तपत्र "लोकमत" यात मराठीत आणि राष्ट्रीय वृत्तपत्र "फ्री प्रेस जर्नल" यांत इंग्रजीत प्रकाशित करण्यात आलेली होती.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, पालघर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर, बोईसर, जिल्हा-पालघर यांना आजपावेतो एकूण ४,३७४ सूचना/आक्षेप विविध सूचित कार्यालयांकडून/प्रत्यक्ष/पोस्टाने/ईमेलव्दारे प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरण विषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी मा. अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे. तरी सर्व उपस्थितांनी उद्रेक करु नये, अप्रिय घटना (untoward incidence), कायदा व सुव्यवस्थेत बाधा आणू नये. शांततेने आपले विचार, सूचना किंवा हरकती नोंदविण्यात याव्यात. ही समिती कुठलाही निर्णय घेत नाही. ही समिती प्रकल्प संमत करत नाही, प्रकल्पाची शिफारस करत नाही आणि तसेच प्रकल्प नाकारतही नाही. आपण उपस्थित केलेल्या सूचना, हरकती यांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेत असते.

त्यावेळी एका स्थानिक उपस्थितांनी सर्व उपस्थितांना आवाहन केली की आपणास लोकशाहीमार्गाने प्रश्न विचारायचे आहेत. कुठलीही शिवीगाळ, अर्वाच्य भाषा बोलू नये. त्यांनी सर्वांना पाणी पुरविण्याची सूचना केली.

त्यावेळी श्री भूषण भोईर, सिंधु सह्याद्री फाऊन्डेशन शिरगाव (मोगरेवाडा), तालुका, जिल्हा-पालघर यांनी हरकत नोंदविली की बाहेर बराच जनसमुदाय आलेला आहे. पोलिसांनी बॅग आत आणून दिलेल्या नाहीत. त्या बॅगेत आपणास सादर करण्यासाठी लेखी सूचना, हरकती या आणलेल्या होत्या. तरी बॅगा आत आणण्याची परवानगी देण्यात यावी. त्यात पाण्याच्या बाटल्या, औषधे होती. या उष्णतेमुळे स्ट्रोक येऊ शकतो. मात्र स्थानिकांना पाणी मिळतच नाही. वाढवण बंदराच्या जनसुनावणीवेळी बॅगा आत आणून देण्यात आल्या होत्या. येथे गरम होत असल्याने लोकांना पाण्याची आवश्यकता आहे. पाण्याची व्यवस्था नाही. म्हणून लोक चिडलेले आहेत. कायद्याप्रमाणे हे योग्य नाही. आमच्या बॅगा तपासून बॅगेसकट आत सोडणे महत्वाचे होते.

अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांना शांततेने प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण ऐकण्याची सूचना केली. त्यांनी पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण करण्यास सुरवात केली. मात्र त्यावेळी बैठकीत काही लोक घोषणा व विरोध दर्शवित होते. त्यावेळी अध्यक्षा यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना कलम १०.३ नुसार जनसुनावणीत स्थानिकांना, प्रकल्पग्रस्त बाधितांना प्रकल्पाची माहिती सांगणे बंधनकारक आहे. सादरीकरण हा पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा एक भागच आहे. त्यानंतर स्थानिकांना, प्रकल्पग्रस्त उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, हरकती या उपस्थित करण्यात येतात. तरीही गोंधळ चालू होता. त्यावेळी -

श्री. विनोद पाटील, महाराष्ट्र मच्छिमार समिती जिल्हा अध्यक्ष यांनी मुरबे व सातपाटी गावातील, सर्व पंचक्रोशीतील गावांतील उपस्थितांना शांततेचे आवाहन करताना सांगितले की जिल्हाधिकारी मॅडम या जिल्ह्याच्या पालक आहेत. त्यांनी ही जनसुनावणी सुरु करण्याअगोदर मा. अध्यक्षा यांनी दोन शब्द ऐकावे ही विनंती. त्यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की टीओआरमध्ये काही गोष्टी नमुद केलेल्या नाहीत. आम्ही १२ सप्टेंबर, २०२५ रोजी स्थानीक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास, जिल्हाधिकारी कार्यालय-पालघर येथे निवेदन सादर केलेले आहे. त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कायद्याप्रमाणे प्रथम सादरीकरण करण्यात येते. त्यानंतरच उपस्थितांना प्रश्न, सूचना विचारण्यास परवानगी देण्यात येते. सादरीकरणानंतर सर्वांना बोलण्याची संधी

देण्यात येईल. सर्वांच्याच भावनांचा आदर राखण्यात येईल. तरी सादरीकरण पुर्ण करुन देण्यात यावे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण पूर्ण केले.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर अध्यक्षा, पर्यावरणविषयत जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले सादरीकरण पूर्ण झालेले असून आता पुढील प्रक्रिया करण्यात येत आहे.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१) **श्री मिलिंद दामोदर राऊत, अध्यक्ष, युवा संघर्ष समिती, तालुका,जिल्हा पालघरः-**

सर्व प्रथम माझा असा प्रश्न आहे की याआधी वाढवणची जनसुनावणी झालेली आहे. त्यावेळी यु ट्युब लिंक ही तयार करुन आधी देण्यात आलेली होती. कारण जे लोक आत येऊ शकले नाहीत किंवा बैठकीस येऊच शकले नाहीत, ते लाईव्ह पाहू शकत होते, ते त्यांची मते नोंदवू शकत होते. तंबूच्या बाहेर बरेच लोक उभे आहेत. ते आत येऊ शकत नाही. त्यामुळे येथील सादरीकरण पाहू शकलेले नाहीत. त्यांना वंचित ठेवण्यात आलेले आहे. आपण सर्वांना बोलण्याची संधी देणार म्हणता, तर ज्यांना सादरीकरण पाहताच आलेले नाही,ते कसे प्रश्न विचारणार आहेत? आपण सादरीकरण परत दाखविणार का?

तसेच सादरीकरण अगोदरच उपलब्ध करण्यात आलेले आहे. त्यातील माहिती चुकीची, दिशाभूल करणारी आहे हे सर्वांनाच माहित आहे. त्या सादरीकरणावर ही पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे हे चुकीचे आहे. प्रकल्पाचे फक्त चांगली बाजू दाखवली जाते. मात्र प्रकल्पाचे तोटे दाखविले जात नाही. त्यामुळे या जनसुनावणीचा आम्ही जाहिर निषेध करतो. तरी ही बेकायदेशीर जनसुनावणी त्वरित थांबविण्यात यावी, अशी विविध संघटनेची पत्रे वारंवार शासनास पाठविण्यात आलेली आहे. शासनाच्या पुर्वपरवानगीशिवाय घेण्यात आलेले सर्वेक्षण, अपुरी व दिशाभूल करणारी माहिती अहवाल यावर आधारलेली ही जनसुनावणी येथेच थांबविण्यात यावी. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस आम्ही पाच मिनिटे देतो, अन्यथा आम्हांला निर्णय घ्यावा लागेल.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की सूचना, विचार, हरकती, आक्षेप नोंदविताना आपण आपले नांव व गावाचे नांव प्रथम सांगावे, म्हणजे बैठकीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेण्यात येईल.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनांची नोंद घेतल्याची माहिती दिली.

त्यावेळी समुहातील उपस्थितांनी यु ट्युब लाईव्ह त्वरित चालू करण्याची मागणी केली.

श्री मिलिंद दामोदर राऊत, अध्यक्ष, युवा संघर्ष समिती, तालुका, जिल्हा-पालघर यांनी सांगितले की बैठकीस येणा-या काही व्यक्तींनी चुकून काळे शर्ट घातलेले आहेत. त्यांना आत सोडण्यात येत नाही. तरी त्यांना आत येऊ द्यावे.

येथे अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पुढील वक्त्यास माईक देण्याची सूचना केली. त्यावेळी काही उपस्थितांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीस बैठकीबाबत रद्द करण्यासाठी पुढील पाच मिनिटे अवधी दिल्याचे सांगितले.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कलम ३.३ नुसार घोषित केलेली जनसुनावणीची तारीख, वेळ व बैठकीचे स्थान हे जोपर्यंत काही आपत्तीजनक परिस्थिती उद्‌भवत नाही तोपर्यंत ते बदलता येत नाही. तरी उपस्थितांनी कुठलाही उद्रेक न करता शांततेने बैठकीत प्रस्तावित सूचना, आक्षेप हे उपस्थित करण्यात यावेत. जनतेच्या माहितीसाठी व त्यांच्या सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठीच ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

श्री. मिलिंद दामोदर राऊत, अध्यक्ष, युवा संघर्ष समिती, तालुका, जिल्हा-पालघर यांनी परत आक्षेप नोंदविला की बैठक रद्द करण्याबाबत आपणास पाच मिनिटांचा वेळ देण्यात आलेला होता. त्यावेळी अध्यक्षा यांनी मत मांडले की एकाच व्यक्तीने वारंवार बोलू नये, दुसरा मुद्दा असेल तर तो उपस्थित करण्यात यावा. येथे पाच हजारपेक्षा जास्त लोक आलेले आहेत, तरी दुस-या व्यक्तीस बोलण्याची संधी देण्यात यावी.

श्री. मिलिंद दामोदर राऊत, अध्यक्ष, युवा संघर्ष समिती, तालुका, जिल्हा-पालघर यांनी परत आक्षेप नोंदविला प्रशासन जबरदस्तीने जनसुनावणी चालू ठेवत आहे, चुकीच्या अहवालावर ही जनसुनावणी घेणे हे अवैध आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या सूचना व हरकतींची नोंद घेण्यात आलेली आहे

अध्यक्षा यांनी सांगितले की ही समिती कुठलाही निर्णय घेत नाही. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी तसेच आपल्या सूचना, विचार, आक्षेप याची

नोंद घेण्यासाठीस ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. बैठकीचा अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल. आपण आपले मुद्दे व्यवस्थित मांडल्यास तज्ज्ञ समितीस योग्य तो निर्णय घेणे सोपे जाईल.

**2) श्री. रामकृष्ण जगन्नाथ तांडेल, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीः-**

आपण येथे जनसुनावणी आयोजित केलेली आहे. तर ठाणे जिल्ह्यात किनारपट्टीवर मच्छिमारांच्या ४७ सोसायट्या आहेत. आपण एकाही मच्छिमार सोसायटीस या जनसुनावणीची माहिती कळविलेली नाही. म्हणून ही जनसुनावणी होऊ शकत नाही. ठाणे जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार संघ हा फेडरेशन आहे. त्यांनाही आपण कळविलेले नाही. त्यामुळे ही जनसुनावणी होऊच शकत नाही.

दुसरा मुद्दा. जिंदालचे नांदगांवला बंदर होणार होते. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे तीन वर्षे केस चालली. नंतर जिंदालने बंदर बांधणार नाही असे सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र (affidavit) लिहून दिलेले होते. तर आता येथे बंदर कसे बांधू शकतो? याबाबत जिल्हा प्रशासनाने अगोदरच माहिती मिळणे योग्य होते. तरी ही जनसुनावणी आयोजित करता येत नाही. उपस्थितांनी प्रकल्प हटावची घोषणा दिली. श्री तांडेल यांनी सांगितले की जनसुनावणी ही अजिबातच होणार नाही.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रत्येक व्यक्तीला एकदाच माईक देण्यात येईल. त्यामुळे प्रत्येक वक्त्याने एकदाच सर्व सूचना, हरकती एकत्रित उपस्थित करण्यात याव्यात.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे

**३) श्री. दीपक राऊत, एका पक्षाचा नेता, तालुका, जिल्हा-पालघरः-**

सन्माननीय अध्यक्षा, येथील पंचक्रोशीतील नागरिक हे सर्वजण प्रकल्पास विरोध करत आहेत. आपण येते प्रतिपादन करत आहात की ही जनसुनावणी स्थानिक, प्रकल्पबाधितांसाठी आयोजित करण्यात आलेली आहे. मात्र आपण त्या पध्दतीने बोलला असता, तर ही जनसुनावणी पुढे गेली असती. मुळात आजची जनसुनावणी ही पूर्णपणे बेकायदेशीर आहे. बैठकीत माझे सहकारी मच्छिमार संघटनेच्या अध्यक्षांनी जो मुद्दा मांडला की या अगोदर या जिंदाल कंपनीने २०१२ साली असेच सादरीकरण दाखवून नांदगांव बंदर विकसनासाठी

जनसुनावणी आयोजित केलेली होती. नांदगांव बंदर विकसनासाठी जनसुनावणीमध्ये आमच्या सर्व ग्रामस्थांनी जिंदालला सादरीकरणसुध्दा करुन दिलेले नव्हते. आता ही जनसुनावणी बेकायदेशीर कशी याचे स्पष्टीकरण देत आहे.

सुप्रीम कोर्टात केस चालू होती आणि जिंदालच्या बाजूने निर्णय होता. सुप्रीम कोर्ट हे आपल्या देशातील सर्वोच्च न्यायव्यवस्था आहे. जिल्हाधिकारी म्हणून आपण सुध्दा जिल्ह्याच्या न्यायाधिश आहात. आपणास कायदेशीर बंधन आहे की आपण निःपक्षपातीपणे आपले कामकाज करायला हवे. सरकार कोणीही असो, त्यांचे आदेश पालन करायचे अशी शासनव्यवस्था चालत नाही. आपणास दिलेला आदेश हा संवैधानिक आहे की नाही व आपण संविधानाच्या चौकटीत त्याचे पालन कसे करणार हा मुद्दा आहे? त्यामुळेच भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारीच हे जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षक या पदांवर कार्यरत असतात. म्हणून आम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडून संविधान पालनाची अपेक्षा करतो.

सुप्रीम कोर्टात ६ ऑगस्ट, २०२२ पर्यत माझ्या दोन याचिका प्रलंबित आहेत, तरीही मी सुप्रीम कोर्टात माझे म्हणणे देत नाही. म्हणून सुप्रीम कोर्टाने ठाणे कोर्टाला संपर्क करुन बेलिफ पाठवून सूचना दिलेली आहे की एका याचिकेत ग्रामस्थ आहेत, तर एका याचिकेत राजकीय पक्ष म्हणून आम्ही सामोरे गेलेलो आहोत, तरी आपण आपले म्हणणे मांडा. आमच्या तोंडी सूचनेनंतर जेव्हा सुप्रीम कोर्टाच्या लक्षात आले की तांत्रिक मुद्द्यावर दाखल केलेली याचिका ही चुकीची आहे, त्यामुळे प्रकल्प प्रवर्तकांना पारित केलेला प्रकल्प उभारणी कालावधी मुदत संपल्याचे लक्षात आले, त्यावेळी सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र शासनाचे प्रतिज्ञापत्र मागितले, त्यानुसार सुप्रीम कोर्टाच्या असे लक्षात आले की कंपनीने प्रकल्प कार्यान्वित करण्याचा आश्वासित कालावधी पाळलेला नाही, त्यामुळेच कंपनीने नांदगांव प्रकल्प गुंडाळला.

आता जर सुप्रीम कोर्ट जर प्रत्येक वादीला नावानिशी नोटिस पाठविते, तर जेव्हा हा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आला, तर आम्ही पक्षकार आहोत, तसेच विविध मच्छिमार संघटना, नांदगाव ग्रामस्थ यांना म्हणजे आम्हांला लेखी नोटीस पाठवून त्याची कायदेशीर पोच घेतल्याशिवाय या प्रकल्पाविषयी जनसुनावणी लावण्याचा आपणास अधिकारच नाही. जिल्हाधिकारी, पालघर यांनी सुप्रीम कोर्टाचा अवमान केलेला आहे, म्हणून मी एक फेर याचिका दाखल करणार आहे. कारण मी पक्षकार असताना मला कोणतीही वैयक्तिक पूर्वसूचना बजाविण्यात आलेली नाही.

आम्ही जेव्हा राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथे याचिका दाखल केली, त्यावेळी ग्रामस्थांच्या ३-४ याचिका होत्या. त्यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी २४ मे,

२०१६ फक्त ग्रामस्थांनाच नाही तर आमच्या पक्षाला रितसर नोटिस काढलेली आहे. मी बराच वेळा सांगितले की माझे ग्रामस्थ हे सहकार्य करतील, जेव्हा टू-वे ट्रॅफिक असेल. मी सूचना केली होती की आधी माझे सर्व ग्रामस्थ बोलतील, कारण २०१२ च्या व आताच्या सादरीकरणात थोडाही फरक नाही. तसेच ही जनसुनावणी ही बेकायदेशिरपणे आयोजित करण्यात आलेली आहे. कारण गुगलवर जाऊन जर मुरबे बाबतचा अहवाल मागितला, तर लक्षात येईल की सार्वजनिक डोमेनवर तो अहवाला उपलब्ध नाही. जर जनसुनावणी पार पडली, तर मी पुन्हा बोलणार आहे. जर ग्रामस्थांचे म्हणणे आहे की ही जनसुनावणी बेकायदेशीर आहे, तरीही आपण ती चालू ठेवत आहेत, तर येथील सर्व ग्रामस्थांचा, माजी मुख्यमंत्र्यांचा प्रतिनिधी म्हणून मी बोलत आहे की ज्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने हे टेंडर काढले त्याच्यावर व बेकायदेशीर जनसुनावणीबद्दल आयोजित केल्याबद्दल शासकीय अधिका-यांवर भविष्यात कारवाई होईल.

आता पुढील मुद्दा - आम्हांला कायदेशीर नोटिस बजावण्यात आलेली नाही. १९९९ ला याच कंपनीचा प्रस्ताव आमच्या सरकारने नाकारला. नंतर विराज बंदराचा प्रस्ताव आला, तो कायदेशीर लढाई करुन प्रस्ताव नाकारला. २०१२ ला जिंदालचा प्रस्ताव सुप्रिम कोर्टात टिकला नाही. जिंदालच्या बाजूने एनजीटी, पुणे येथे निर्णय होता. जिंदाल सुप्रीम कोर्टात गेला होता. तर एक तांत्रिक मुद्दा की प्रकल्पाची मुदत संपली होती, आणि आता जिंदाल सर्वांसमोर सांगते की मेरीटाईम बोर्डाने टेंडर काढले, तर मेरीटाईम बोर्डाने सुप्रीम कोर्टाचा अवमान केला की नाही? ज्या जिंदालचा प्रस्ताव रद्द झाला त्याच जिंदालला टेंडर परत कसे देण्यात आले? हे टेंडर घेण्यास जिंदाल अजिबातच पात्र नाही. तरी ते केले गेले.

माझ्या पक्ष प्रमुखांनी ग्रामस्थांना एक वर्षापूर्वीच आश्वासन दिले की जिंदाल प्रकल्प होणारच नाही. त्याला आम्ही बांधिल आहोत. २०१२ ला मीच सांगितले की जिंदालने कितीही खर्च करावा, खर्च वाया जाणार आहे.

आता महत्वाचा मुद्दा माझ्या ग्रामस्थांसाठी आहे. नांदगांवला बंदर राबविणे एवढाच जिंदालचा उद्देश नाही. व्यापारी उद्देशाने बंदर बांधले व व्यापारी फायदा घेतला एवढेच नाही. जिंदाल कंपनीचा अहवालात त्यांनीच सांगितले की आहे की त्यांच्याकडे महाराष्ट्र किनारपट्टीवर अनेक पोर्ट आहेत. तसेच भारत सरकारचे आशियात दोन नंबरचे असलेले जवाहरलाल नेहरु पोर्ट ऑथरिटी बंदर आहे. तर त्याच्या जवळ नांदगांव येथे खाजगी बंदरास का परवानगी देत आहेत, तर याच्यात आर्थिक घोटाळा आहे. सरकारने फक्त Letter Of Intent दिलेले आहे. ते मिळाल्यानंतर लगेचच जिंदालने सेबीकडे नोंदणी केलेली आहे.

हा आर्थिक घोटाळा आहे. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी इतर व्यक्तींना बोलायचे आहे, तरी थोडक्यात बोलण्याची सूचना केली.

श्री. दीपक राऊत यांनी सांगितले की जिंदालने जो आर्थिक घोटाळा केलेला आहे, त्याच्याविरुध्द मी गुन्हा दाखल करणार आहे

श्री. दीपक राऊत यांनी आक्षेप नोंदविला की आम्हांला आजची जनसुनावणी मान्य नाही. तरी ती त्वरित रद्द करुन सहा महिन्यांनी परत बैठक बोलविण्या यावी, आम्ही सर्व मुद्दे अभ्यास करुन उपस्थित करु.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. अध्यक्ष म्हणून मी विनंती करते की आपण दुस-यांना बोलण्याची संधि द्यावी.

अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांना प्रथम आपले नाव, गावाचे नाव सांगून आपले मुद्दे संक्षिप्त मांडण्याची सूचना केली.

**४) श्री. रामकृष्ण जगन्नाथ तांडेल, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीः-**

वाढवण बंदर आम्ही कदापी होऊन देणार नाही. जरी पंतप्रधानांकडून उद्घाटन करण्यात आलेले असले, तरी सुप्रीम कोर्टात केस दाखल करण्यात आलेली असून २८ सप्टेंबर, २०२५ पर्यंत त्यावर स्टे देण्यात आलेला आहे. आमचे मच्छीमार बांधव या वाढवण बंदरामुळे विस्तापीत होणार आहेत. आजची जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे. कारण सुप्रीम कोर्टात जिंदालने लिहून दिलेले आहे की आम्ही येथे बंदर विकसित करणार नाही. आता कोर्टाचा अवमान जिंदाल करत असून पंचक्रोशीतील ग्रामस्थ, मच्छिमार बांधव, ग्रामस्थ हे विस्थापित होणार आहेत. रोजीरोटीचा प्रश्न आहे. तरी हा प्रकल्प रद्द करण्यात यावा, आमचा शाप तुम्ही घेऊ नका.

५) **श्री. धीरज गावड, उपसरपंच, नांदगाव ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा-पालघरः-**

माझा या मुरबे बंदराला जाहिर विरोध आहे. महाराष्ट्र शासन व एम.एम.बी. यांनी सर्व नियम डावलून जिंदालला मुरबे बंदर विकसित करण्यास जी परवानगी दिली, त्याचा मी जाहिर निषेध करतो. मी अध्यक्ष महोदया यांनी सांगू इच्छितो की काल आपल्या दालनात बैठक झालेली आहे. त्यांनी तयार केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालच मूळात

चुकीचा आहे. जर हा ईआयए अहवालच खोटा आहे, तर या चुकीच्या ईआयए वर आधारित पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीस कायदेशीर मान्यता आहे काय? उत्तर अपेक्षित आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की आपण केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री. धीरज गावड यांनी मत मांडले की आम्हांला माहित आहे की प्रशासकीय उत्तरच देण्यात येईल. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की त्यांनी जे सादरीकरण केले व जो अहवाल उपलब्ध करण्यात आला, त्यात कोठेही टीओआर लावलेला नाही. कारण त्यांना जो टीओआर पारित करण्यात आला, त्याप्रमाणे त्यांनी प्रकल्प परिघात १०.० कि.मी. परिघात सर्वेक्षण करण्यात आले हे खोटे आहे.

सादरीकरणात सांगण्यात आले की या प्रकल्पामुळे मच्छिचे उत्पादन वाढेल, तर ऑपरेशन टप्प्यात ४.७.२.२ नुसार जहाजांची वाहतुक वाढल्यानंतर त्या क्षेत्रातील मच्छिमार, मच्छिमारी क्षेत्र यावर काय परिणाम होईल, याचे विश्लेषण नाही.

त्याचप्रमाणे प्रकल्प क्षेत्रातील कांदळवन (Mangroves) किती प्रमाणात नष्ट होईल, त्याची पुर्वपरवानगी व त्याबाबत विश्लेषण याचा उल्लेख नाही.

तसेच ब्रेकवॉटर वॉल बांधणार आहेत, तर वाळूची धूप किती होईल किंवा वाळू वाढेल का याबाबत काहीही शास्त्रीय माहिती नाही.

ज्या ईआयए अहवालात याचा कुठलाच उल्लेख नाही, म्हणजे हा ईआयए चुकीचा, खोटा आहे. आणि त्यावर आधारित ही पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सुध्दा बेकायदेशीर आहे.

तसेच ज्या ठाकूर कॉलेजने हे सर्वेक्षण केले, त्यांनी फक्त तीन महिन्यांचाच अभ्यास केलेला आहे. आमच्या गावात एक दिवसासाठी आलेला कॉलेज कॅम्प तीन महिन्यांचे सर्वेक्षण कसे करु शकते? तरी जैववैविधता कायदा २००२ व २००७ च्या अनुषंगाने त्यांनी कुठल्याही प्रकारची महाराष्ट्र शासनाची पूर्व परवानगी घेतलेली नाही आणि त्यांनी शैक्षणिक कामासाठी केला, आणि पर्यावरण सल्लागार मे. बिल्डिंग एन्व्हॉयरमेंट (इंडिया) प्रा.लिमिटेड यांनी त्याचा वापर त्यांच्यासाठी करुन बनावट अहवाल (forgery report) केलेला आहे, म्हणून पर्यावरण सल्लागार यांच्याविरुध्द पूर्वीच्या आय.पी.सी. ४२० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा.

मा. अध्यक्ष महोदया, २०१२ ते २०२५, आम्ही नांदगावकरांनी जिंदालला आमची शक्ती दाखविलेली आहे. हा प्रकल्प आम्ही होऊ देणारच नाही. आपण या जिल्ह्याच्या पालक आहात, तरी ही चुकीच्या पध्दतीने आयोजित करण्यात येणार जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

६) **श्री. जयवंत आत्माराम तांडेल, ठाणे जिल्हा मध्यवर्ती मच्छीमार फेडरेशन अध्यक्षः-**

आमच्या जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार फेडरेशनबरोबर या जनसुनावणीबाबत कुठलाही पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही. आमच्या फेडरेशनमध्ये जवळजवळ ४७ मच्छिमार संस्था आहेत. तसेच आमच्या ४७ मच्छिमार संस्थांना या जनसुनावणीबाबत अवगत करण्यात आलेले नाही, आम्हा मच्छिमार समाजास यासाठी वंचित करण्यात आलेले आहे. त्यामुळे आमचे मच्छिमार बंधू येथे आपल्या सूचना, हरकती उपस्थित करु शकले नाहीत. तरी ही चुकीच्या पध्दतीने आयोजित केलेली जनसुनावणी ही बेकायदेशीर असुन ती रद्द करण्यात यावी आणि आम्हांला सहा महिन्यांचा मुदतवाढ देण्यात यावी, जेणेकरुन आम्हां मच्छिमारांना प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे संभाव्य आघात, परिणाम याबाबत सूचना, आक्षेप, प्रश्न नोंदविण्याची संधि मिळेल. तरी ही जनसुनावणी त्वरित रद्द करण्यात यावी.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रतिपादन केले की उपस्थित करण्यात आलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

७) **श्री संजय कोळी, माजी नगरसेवक, वसई विरार महानगरपालिका, जिल्हा- पालघर, माजी अध्यक्ष, वसई मच्छिमार संस्था, संचालक, बॅसिन कॅथलिक बॅंकः-**

आपण ही जनसुनावणी आयोजित करत आहात, ती वाढवण बंदराच्या पार्श्वभूमीवरच आयोजित करत आहात. वाढवण बंदराच्या जनसुनावणीत १००% बंदर विरोधी असतानाही तो प्रकल्प शासन रेटून नेत आहे. आजच्या पर्यावरण विषयक जनसुनावणी संदर्भात काही टप्पे आहेत. ओळख (Identification), मंजूरी/approval असे टप्पे आहेत. तसेच एक टप्पा आहे की प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीस सामोरे जाणे. त्यासाठी अगोदर पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवालासाठी प्रकल्प स्थानाच्या परिघात पर्यावरणीय सर्वेक्षण करणे, त्यासाठी येथे भारत सरकारकडून प्रथम टीओआर प्राप्त करणे. तर हा ईआयए अहवाल तयार करताना टीओआर निर्देशांचे पालन झालेले नाही.

चर्चेत केलेल्या आक्षेपांनुसार टीओआर निर्देशांचे पालनच झालेले नाही - प्रस्तावित प्रकल्पामुळे तेथील माशांच्या उत्पादनावर, समुद्र जलचरांवर होणारा परिणाम, किनारपट्टीजवळील शेतजमिन क्षेत्रावर होणारा परिणाम याबाबत अभ्यास करण्यात आलेला नाही. फक्त ईआयएमध्ये परिसरात संभाव्य परिणामांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. अहवालात प्रस्तावित प्रकल्पामुळे ६०० व्यक्तींना रोजगाराची संधि प्राप्त होईल हा उल्लेख आहे. मात्र या प्रकल्पामुळे मच्छिमार व त्यावर अवलंबून असणा-या ६०,००० लोकांच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोक-या कायमच्या जाणार आहेत, याबाबत काहीही उल्लेख नाही. आम्ही सरकारच्या मेहेरबानीवर नोक-या करत नाही, तर आम्ही स्वबळावर आमच्या नोक-या करत आहोत. आम्ही आमच्या ताकदीवर हा रोजगार आणि व्यवसाय उभा केलेला आहे.

अहवालात असा उल्लेख आहे की मत्स्य आणि मच्छिमार यांच्यावर होणा-या परिणामांचा अभ्यास चालू आहे. जर अभ्यास चालू आहे, तर गरिब मच्छिमारांवर प्रकल्प लादत आहेत, ही शरमेची बाब आहे. म्हणूनच ही बेकायदेशीर जनसुनावणी आहे असा माझा आरोप आहे. ९० कि.मी. लांबीच्या किनारपट्टीवरिल भूमीपुत्र, कोळी, आगरी समाज हा बाधित होणार आहे.

परिसरात प्रदूषण पातळी ही किती आहे, प्रदूषणाची पातळी ही हिताची आहे काय, मी २००७ पासून पिंजरा या प्रकल्पावर काम केलेले आहे. एकही पिंजरा प्रकल्प यशस्वी झालेला नाही. सादरीकरणात artificial rib चा उल्लेख आहे. तर कुठलीही ती यशस्वी झालेली नाही.

म्हणून ही जनसुनावणी ही तात्काळ रद्द करण्यात यावी. वाढवण बंदराला तसेच मुरबे बंदराला आमचा विरोध असून जर बंदर बांधण्याचा प्रयत्न केल्यास आमच्या जीवावरुन तुम्हांला चालत जावे लागेल याची अगोदरच सूचना देण्यात येत आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या हरकती/आक्षेपांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

८) **श्री. सचिन रमेश लोखंडे, राहणार-आलेवाडी गोंदवले रहिवाशी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा प्रदेशाध्यक्ष-आठवले गटः-**

आपण ही जी जनसुनावणी आयोजित केलेले आहे, ती बेकायदेशीर आहे, कारण जी २०१२ ला घेतलेली होती, ती ग्राहय असताना ही परत घेणे कितपत योग्य आहे? आम्हांला माहित आहे की जसे वाढवण बंदर आमच्यावर लादण्यात आले, तसेच मुरबे बंदरही आमच्यावर

लादण्यात येणार आहे. जर हा प्रकल्प स्थानिकांच्या, नागरिकांच्या जीवावर बेतणारा असला तर येथील प्रत्येक नागरिक प्रकल्पविरोधासाठी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही आणि यास जबाबदार शासन असेल. येथे जनआक्रोश दिसत आहे. तरी मा. अध्यक्षा यांना प्रकल्प रद्द करण्याची विनंती करत आहोत, अन्यथा आम्ही जनआंदोलन करण्यास तयार आहोत.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या हरकती/आक्षेपांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

९) **<u>एडव्होकेट विद्युत मोरे, नांदगाव ग्रामस्थ, तालुका, जिल्हा-पालघरः-</u>**

ही जनसुनावणी अपु-या आणि त्रुटीपूर्ण अहवालावर होत आहे त्यामुळे ती बेकायदेशीर आहे. येथे मी सांगू इच्छितो की ज्यावेळी या प्रकल्पाची घोषणा झाली, त्यावेळी म्हणजे सुमारे एक वर्षापूर्वी पंतप्रधान कार्यालयाला माझ्या हरकती सादर केलेल्या आहेत. पंतप्रधान कार्यालयातून असे उत्तर देण्यात आले की प्रस्तावित कंपनी माझ्या हरकतीला उत्तर देईल. तर जिंदाल कंपनीचे अधिकारी येथे उपस्थित आहेत का याबाबत विचारणा केली.

यावेळी अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी एडव्होकेट विद्युत मोरे यांना सूचना केली की आपण आपल्या सूचना, हरकती उपस्थित करण्यात याव्यात.

एडव्होकेट विद्युत मोरे यांनी आक्षेप नोंदविला की कंपनीकडून अद्यापपावेतो उत्तर देण्यात आलेले नाही.

तसेच या ग्रुपचा जयगड येथे याचसारखा प्रकल्प आहे. त्या प्रकल्पास राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे यांनी दंड आकारला आहे. कारण जयगडच्या प्रकल्पाने पर्यावरणविषयक अटी व शर्ती यांचा भंग केलेला आहे. कशावरुन प्रस्तावित प्रकल्पसुध्दा येथे पर्यावरणविषयक अटी व शर्ती भंग करणार नाही. तरी ही बेकायदेशीर जनसुनावणी ही त्वरित रद्द करावी, ही जनसुनावणी आम्हांला मान्य नाही.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या विचारांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

१०) **<u>श्री. विनोद गंगाधर पाटील, सातपाटी सर्वोदय संस्थेचा माजी अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र कृती समितीचा पालघर जिल्हाध्यक्षः-</u>**

जेएसडब्लु प्रकल्पाच्या मुरबे पोर्टच्या ईआयए अहवालात सातपाटी व दांडी गावाचा मच्छिमार गाव म्हणून सुध्दा माहिती मिळत नाही. तेथील लोकसंख्या जवळपास ३५,०००

आहे. सातपाटी मुरबे या दोन्ही गावांमध्ये ४०० हुन जास्त नौका आहेत. मुरबे बंदर झाल्यानंतर आमच्या शेकडो नौका ज्या डेली फिशिंगमध्ये आहेत, उदा- वडराई, केळवा, सातपाटी, दांडी, मुरबे, डहाणू या भागातील आहे. या प्रकल्पामुळे या सर्व बोटींचे मच्छिमारी क्षेत्र, उदरनिर्वाहाचे क्षेत्र हे त्यांच्या हातातून जाणार आहे. सातपाटी गावातील खारेकुरण खाडीचे मुख हे फक्त १०० फुट एवढेच आहे. १० कि.मी ब्रेक वॉटर बंधारा झाल्यानंतर आमचे सातपाटी गाव हे लो लाईंग क्षेत्रात आहे. बंदरामुळे पाणी शिरेल, तर आमची खाडी ही बंद होणार आहे काय? आमच्या गावातील बोटींवर याचा काय परिणाम होईल याबाबत कुठलीच माहिती ईआयए अहवालात नाही.

याबाबत अखिल महाराष्ट्र कृती समितीने १२ सप्टेंबर, २०२५ रोजी लेखी निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय-पालघर व स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयात सादर केलेले आहे की माहिती अपूर्ण असल्याने ही जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी. तसेच २५ सप्टेंबर, २०२५ ला सुध्दा निवेदन दिलेले होते. परवासुध्दा आमच्यासोबत जिल्हाधिकारी यांनी बैठक घेतल्यानंतरही प्रस्तावित प्रकल्पामुळे आमच्या लोकवस्तीवर व धंद्यावर काय परिणाम होणार आहे, याची माहिती नाही. तरी ही सर्व माहिती ईआयए अहवालात लिहिल्यानंतरच लोकांना उपलब्ध करुन देण्यात यावी व नंतर परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. तरी आजची जनसनावणी ही रद्द करण्यात यावी.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या हरकती/आक्षेपांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

११) **श्री मंदार देव, ग्रामस्थ-मुरबे, तालुका, जिल्हा-पालघरः-**

राष्ट्रभक्ती व देशभक्ती निर्माण करणारी माझी भारत माता. येथील आक्रोश पाहून जिल्हाधिकारी मॅडमने ही जनसुनावणी तात्काळ रद्द करणे आवश्यक आहे. बैठकीत सर्वजण कायदेशीर जनसुनावणी नाही असे प्रतीपादन केले असुनही जिल्हा प्रशासन ती जाणीवपूर्वक बैठक रेटुन पुढे नेत आहे. उपस्थितांनी केलेल्या सूचना, आक्षेपांवर नोंद घेतली हे सांगण्यासाठी शासनाचे उच्च पदस्थ, वर्ग-१ व वर्ग-२ अधिकारी येथे बसविण्याची काय गरज आहे?

आम्ही गणपती काळात डी.जे. लावला तर पोलिस येऊन आमच्यावर कारवाई करतात. येथे एमआयडीसीत मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे, भगवान नाका भागात दहा मिनिटांपेक्षा जास्त वेळ उभे राहू शकत नाही. तर तेथे कारवाई होत नाही. तर त्यांच्यावर का कारवाई होत नाही? तर संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया पाळून ही जनसुनावणी आयोजित करण्यात यायला

हवी होती. येथे जन आक्रोश करत आहेत जनसुनावणी रद्द करा, तर आमची मागणी आहे की प्रदूषण नियंत्रण मंडळच बंद करा. कारण म.प्र.नि. मंडळ अधिका-यांने सांगावे हायड्रोजन-डाय सल्फाईडचे प्रमाण किती, सल्फाईडचे प्रमाण किती, त्यासाठी लागणा-या Tolerance Value प्रमाण किती आहे याची माहिती बैठकीत सांगावी. येथील खाडीमध्ये किती प्रकारचे जीव होते व आता किती आहेत हे सांगावे. पन्नास वर्षांपूर्वी एखाद्यालाच कॅन्सर होत असे, आता प्रचंड प्रमाण वाढलेले आहे. यास कोण कारणीभूत आहे? हे प्रदूषण कारणीभूत आहे.

सादरीकरणात दाखविण्यात आले आहे की या प्रकल्पामुळे काही घटक हे बाधित होणार आहेत. मात्र त्यावरिल उपाययोजना सांगत नाहीत. म्हणजे कंपनीस ते मान्य आहे की या बंदरामुळे या परिसरात तोटे होणार आहेत. जर जन आक्रोश चालू आहे, तर ही बेकायदेशीर जनसुनावणी ही त्वरित बंद करणे आवश्यक आहे. तर प्रशासनास हे लक्षात येणे आवश्यक आहे की ही जनसुनावणी बंद करणे आवश्यक आहे.

या पृथ्वीवर एक डेड सी आहे. डेड सी असल्याने तेथे एकही नदी त्यात मिसळत नाही, त्यामुळे एकही सजीव तेथे नाही.

आमचा परिसर गोल्डन बेल्ट आहे. कारण येथे ब-याच नद्या मिसळतात. तेथून प्लॅंकटन येते. ते माशांचे खाद्य आहे, त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात मासे मिळतात. जर येथे येणा-या नद्याच प्रकल्पामुळे बंद करणार असतील, तर मासे मिळणारच नाही, त्यामुळे आम्ही १००% बाधित होणार आहोत. तरी ही जनसुनावणी आताच्या आता बंद करावी ही आमची मागणी आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या हरकती/आक्षेपांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

१२) **<u>श्री पृथ्वेश चंद्रकांत चुरी, राहणार-मुरबे गावाचा शेतकरी आणि रहिवाशी, तालुका, जिल्हा-पालघरः-</u>**

माझ्या जमिनीसाठी, माझ्या मुरबे गावच्या मच्छिमारांसाठी बोलत आहे. या प्रकल्पामुळे आमची जमीन खराब होणार आहे, शेती नष्ट होणार आहे. आम्ही नष्ट होणार आहोत. या बंदरामुळे समुद्राचे पाणी गावात येईल, मासेमारी बंद होईल. आम्हांला सांगतात हा विकास आहे, पण तो विकास नको जो आमची शेती नष्ट करतो, आमचे जीवन उध्वस्त करत आहे.

विकास हा लोकांसाठी असावा, लोकांच्या विरोधासाठी नसावा.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या हरकती/आक्षेपांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

१३) **<u>श्री. भूषण भोईर, संचालक, सिंधु-सह्याद्री फाऊन्डेशन, तालुका, जिल्हा पालघरः-</u>**

आमची बरेच ग्रामस्थ हे बाहेर उभे आहेत, तरी त्यांना आत येऊन द्यावे.

१४) **<u>श्री रामकृष्ण जगन्नाथ तांडेल, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीः-</u>**

बैठकीत अनेकांनी मुद्दे मांडले की जनसुनावणी बेकायदेशीर आहे, ती रद्द करण्यात यावी.

यात एक मुद्दा आला - राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे यांनी त्यावेळी जिंदाल कंपनीस आदेश पारित केलेले होते की स्थानिक मच्छिमारांसाठी दरवर्षी १५-५० कोटी सीआरएस निधी उपलब्ध करुन द्यायचा. म्हणजे मच्छिमारांचे नुकसान होणार आहे हे एनजीटीने कबूल केलेले आहे.

तसेच आमचे हजारो लोक हे मंडपाच्या बाहेर आहेत. त्यांना पोलिस सोडत नाही. जर आपली एवढ्या जनसमुदायास आत घेण्याची व्यवस्था नाही, तर ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. पोलिस अधिकारी बाहेर सांगतात की जागा नाही. त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. बाहेर किती लोकांची गर्दी आहे हे स्क्रीनवर दाखविण्यात यावेत. म्हणजे बाधित लोकांना बोलण्यापासून वंचित ठेऊन ही जनसुनावणी कशी होऊ शकते? सर्व बाधितांना येथे येऊन बोलण्याचा अधिकार आहे. प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. येथे सर्व नागरिकांनी मुद्दा मांडला की जनसुनावणी रद्द करा. श्री तांडेल यांनी सर्व उपस्थितांना पाठिंबा देण्यासाठी हात उंच करण्याची सूचना केली. सर्वांना हात वर केले.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या हरकती/आक्षेपांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

१५) **<u>श्री. अशोक गोविंद शिंगाडा, सदस्य, नांदगाव ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा-पालघर, राष्ट्रीय अध्यक्ष, उध्र्व ब्रिगेड आदिवासी संघटनाः-</u>**

मी गेटवर पाहिले की काळे कपडे घातलेल्या आमच्या ग्रामस्थ बांधवांना पोलिस येऊन देत नाहीत. ही लोकशाही आहे की हुकूमशाही? ज्यांना निषेध करायचा आहे, त्यांना तो

व्यक्त करण्याचा संवैधानिक अधिकार आहे. ही जनसुनावणी अवैध आहे, कारण बाहेर रजिस्टरमधील १८५ लोकांचे आक्षेप महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या लोकांना फाडलेले आहेत. त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. त्याशिवाय ही जनसुनावणी पुढे होणार नाही. मी आणि श्री. कुंदन संखे यांनी ते पाहिलेले आहे. फोटो काढलेले आहेत. अधिका-याचे बोलणे टेप केलेले आहे. जर एका रजिस्टरमधील तीन पाने फाडली असतील तर अशी किती रजिस्टर फाडली असतील. ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. जर रजिस्टरची पाने फाडतात, तर किती आक्षेप फाडले असतील, याचे स्पष्टीकरण येथे देण्यात यावे. तरी ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या हरकती/आक्षेपांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

१६) **श्री. कुंदन राऊत, शेतकरी-**

मी शेतकरी असल्याने मला पर्यावरणाविषयी जागरुकता आहे. शेतकरी व मच्छिमार हा जगाचा पोशिंदा आहे. भारतात महापूर येत आहेत, निसर्गाचा कोप होत आहे. याचे कारण प्रदूषणात वाढ आहे. अशा वेळेस असे प्रदूषणकारी प्रकल्प का जबरदस्तीने उभारलेले जातात. हे प्रकल्प थांबले पाहिजेत. आज बरेच प्रकल्प पालघर जिल्ह्यात आणून पालघर जिल्हा हा उध्वस्त करणे चालले आहे. आम्ही पिढ्यानपिढ्या शांततेने जगत आहोत. ही शांतता आमची उध्वस्त करणे सुरु आहे.

सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे जागतिक तापमान वाढीमध्ये कुठलाही नविन प्रकल्प होता कामा नये. तरी हा प्रकल्प रद्द झालाच पाहिजे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

१७) **श्री. मानेन्द्र हरिश्चंद्र आरेकर, महाराष्ट्र मच्छिमार समिती जिल्हाध्यक्षः-**

आमची मच्छिमार समिती मच्छिमारांसाठी काम करते, मात्र आमच्या समितीस या बैठकीविषयी पूर्वसूचना शासनाने, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेली नाही. आमच्या मच्छिमारांना विश्वासात घेऊनच ही जनसुनावणी आयोजित करणे आवश्यक होते. म्हणून ही जनसुनावणी ताबडतोब रद्द करावी अशी मी आपणास विनंती करत आहे

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

१८) **श्री. भूषण भोईर, संचालक, सिंधु-सह्याद्री फाऊन्डेशन, तालुका, जिल्हा-पालघरः-**

येथील तांत्रिक मुद्देसुध्दा विचारात घेणे आवश्यक आहे. प्रकल्पास प्राप्त झालेल्या टी.ओ.आर. नुसार प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सर्वेक्षण केलेले नाही व तसे काम केलेले नाही. अपु-या सर्वेक्षणावर ही जनसुनावणी ही शासनाकडून आयोजित करण्यात आलेली आहे. याची नोंद करण्यात यावी. ही जनसुनावणी कायदेशीररित्या वैध नाही. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, पोलिस अधिक्षक-पालघर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे याबाबत पत्रव्यवहार करूनही ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. या बेकायदेशीर जनसुनावणीत आमची कायदेशीर मते उपस्थित करण्यास आम्हांला भाग पाडले जात आहे.

पहिला मुद्दा - सामाजिक प्रभाव मूल्यांकन - Social Impact Assessment (एसआयए) -- हा या जनसुनावणीचा पाया आहे. एस.आय.ए., ईआयए हे अपूर्ण आहेत. असे असतानाही ही जनसुनावणी आयोजित करण्यात आली.

तसेच एनसीएससीएम, चेन्नाई (National Centre For Sustainable Coastal Management, Chennai) यांनी प्रस्तावित प्रकल्प हा स्थिर किनारा (stable coast) म्हणून घोषित केलेला आहे.

एनसीएससीएम, चेन्नाई यांनी सर्वेक्षण हे २०१३ ला केलेले आहे. आणि मागच्या बारा वर्षांपूर्वीच्या सर्वेक्षणानंतर त्यांनी याबाबत पुनर्सर्वेक्षण केलेले नाही. त्यांनी तयार केलेला आराखडा ही बारा वर्षापुर्वीच्या सर्वेक्षणावर आधारित आहे. तर याचा आधार प्रकल्प प्रवर्तक घेऊ शकत नाही. दर पाच वर्षांनी सीआरझेडचे रिव्हिजन होते, कारण दर दहा वर्षात किनारपट्टी रेषा (coast line) या बदलत असतात. जागतिक तापमान वाढीचा परिणाम हा समुद्र किना-यावर पडत असतो. त्यामुळे त्याचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. एनसीएससीएम, चेन्नाई यांनी प्रत्यक्ष येऊन येथे सर्वेक्षण केलेले नाही. येथील माशांची प्रजनन क्षेत्र, कोरल ड्रॉ, याचा अभ्यास अहवालात नाही. त्यामुळे एनसीएससीएम, चेन्नाई यांचा संदर्भ घेणे चुकीचे आहे.

तसेच मासेमारीची गावे सुध्दा अहवालात नोंदविलेली नाहीत. वाढवण बंदर, मुरबे बंदर, शीप ब्रेकिंग यार्ड, विमानतळ हे आमच्या मासेमारी क्षेत्रात येत आहे. ते क्षेत्र रेकॉर्डवर न आणता आमच्याकडून हिसकावून घेत आहेत. हा स्थानिकांवर अन्याय आहे.

ईआयए अहवालात मायनिंग क्षेत्राचा उल्लेख नाही, मायनिंग क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यातच आलेले नाही. येथे टीओआरचे उल्लंघन करण्यात आलेले आहे.

तसेच खेकडे व जे इतर जलचर, बरेसचे कोरल्स याची अहवालात नोंदच नाही. मुरबे बंदराच्या आजूबाजूला ज्या काही कोरल्स स्पेजीश आहेत, त्याचा उल्लेख नाही.

प्रस्तावित किनारपट्टी रेषा (coastal line) ही अणुक्षेत्राच्या Emergency Planning Zone मध्ये येते. शिवाय आमच्या काही गावांच क्षेत्र येते. तेथे आपण एलपीजी, एलएनजी सारखी स्फोटके व ज्वालाग्रही वस्तूची येथे साठवण होणार आहे. दुर्दैवाने काही अपघात झाल्यास संपूर्ण पालघर जिल्हा हा बेचिराख होणार आहे. येथे आपत्कालीन व्यवस्थापन योजना तयार नसतानाही ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. मासेमारीवर होणार परिणाम, जो पालघर शहरात राहतो, त्यावर होणारा परिणाम याचा अहवालात उल्लेख नाही.

या बेकायदेशीर जनसुनावणीचा एक भाग आहे ठाकूर कॉलेजचा अहवाल. अहवालात जेएसड्ब्ल्यु नावाचा उल्लेखच नाही. ठाकूर कॉलेजचे ग्रामपंचायतीस पत्र आहे की सदरहू अहवाल हा गैर व्यावसायिक वापरासाठी आहे. मात्र ठाकूर कॉलेजने कळविले की हा अहवाल जेएसड्ब्ल्यु साठी आहे हे आम्हांला माहितच नव्हते.

श्री भूषण भोईर यांनी सांगितले की ठाकूर कॉलेजच्या अहवालात जी bio-diversity चे identification दिलेले आहे, त्यात त्यांनी शंखाला शिंपल्यांच्या यादीत टाकलेले आहे. त्यांनी विविध जलचर प्राण्यांची चुकीची नांवे व खरी नावे कोणती याची माहिती दिली. त्यांनी मत मांडले की हा bio-diversity अहवाल कुचकामी आहे.

तरी चुकीच्या अहवालावर आधारित जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

१९) **<u>श्री. प्रमोद आरेकर, मुरबे जिंदाल बंदर विरोधी संघर्ष समिती सचिवः-</u>**

जनसुनावणीत जी चर्चा चालू आहे, त्याचे इतिवृत्त कोणी लिहित आहे काय?

त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की इतिवृत घेण्यात येत आहे. तसेच व्हिडिओ रेकॉर्डिंगसुध्दा चालू आहे. इतिवृत्ताचा व्हिडिओ रेकॉर्डिंग हा भाग आहे.

आपणास ३-४ वेळा पत्र पाठविले होते की सदरहू जनसुनावणी ही रद्द नाही, पण जो १,३०० पानांचा अहवाल दिलेला आहे, तो अभ्यासासाठी पुढे ढकलण्यात यावी. कारण सीआरझेड, सीझेडएमपी व मच्छिमारांचे बाधित क्षेत्र किती याचा उल्लेख नाही म्हणून निवेदन सादर केलेले होते. जरी जनसुनावणी प्रक्रिया चालू आहे, तरी येथे सर्वांनीच जनसुनावणी त्वरित रद्द करण्याची मागणी केलेली आहे. त्याचा विचार नक्कीच करावा.

तसेच ठाकूर कॉलेज विद्यार्थ्यांनी गावात येऊन बेकायदेशीर गावात सर्वेक्षण केले, त्याबाबतची रितसर तक्रार आम्ही सागरी पोलिस स्टेशन, सातपाटी पोलिस चौकीत दिलेली आहे. तरी ठाकूर कॉलेजवर गुन्हा दाखल व्हावा अशी आमची मागणी आहे. कॉलेजचे विद्यार्थी हे शिबिरासाठी ७-७ दिवस आमच्या गावात येत असतात. त्यांची जेवणाची, राहण्याची सोय गावकरी करतात. पण आमच्या नकळत आमच्या गावात राहून सर्वेक्षण करुन तो डेटा कंपनीस विकत असतील, तर त्यांच्यावर ४२० चा गुन्हा दाखल करण्यात यावा.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

२०) **<u>सौ. मोनालिसा स्वप्नील तरे, सरपंच, ग्रामपंचायत-मुरबे, तालुका, जिल्हा पालघरः-</u>**

कंपनीने जो ईआयए अहवाल दिलेला आहे, तो अपूर्ण आहे. त्यामुळे ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. ईआयए अहवाल चुकीचा असून तो चुकीच्या माहितीवर आधारित आहे. खरी परिस्थिती, दुःष्परिणाम नमूद केलेले नाहीत. तसेच ठाकूर कॉलेजने आमची पूर्वपरवानगी न घेता आमच्या परिसरात खाडीचे, समुद्राचे सर्वेक्षण करुन कंपनीचा अहवाल तयार करण्यास मदत केलेली आहे. प्रस्तावित प्रकल्प हा स्थानिक मच्छिमारांसाठी धोकादायक असून परिसरातील जैव विविधता धोक्यात येणार आहे. अनेक माशांच्या प्रजाती नष्ट होणार आहेत. शेतीचे भूसंपादन झाल्याने शेतकरी भूमीहिन होणार आहे. वाढवण बंदराचा घाट घालून आता जिंदाल बंदर उभारुन स्थानिक मच्छिमारांना देशोधडीला लावण्याचा घाट आहे. वाढवण व मुरबे बंदर यांचा एकत्रित दुःष्परिणामाचा विचार केल्यास परिसराचे खूपच मोठे नुकसान होणार आहे. शेतक-यांच्या उपजिविकेवर परिणाम होणार आहे. या प्रकल्पामुळे परिसरात

वाहतुक, घनकचरा, सांडपाणी यात वाढ झाल्याने वातावरण दुषित होणार आहे आणि शासकीय यंत्रणेवर अतिरिक्त भार पडणार आहे.

ईआयए अहवाल अपुर्ण, चुकीचा असून त्यावर आधारित पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही बेकायदेशीर असुन माझा प्रस्तावित प्रकल्पास प्रखर विरोध आहे. कोणी कितीही प्रयत्न केले तरी हा प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

२१) **<u>श्री राकेश राजेन्द्र तरे, उपसरपंच, ग्रामपंचायत मुरबे, तालुका, जिल्हा पालघरः-</u>**

मी येथे प्रस्तावित प्रकल्पास जाहिर विरोध करण्यास उपस्थित असून शासनाने दिलेली परवानगी आम्हांला अमान्य आहे. ईआयए अहवालात ज्या त्रुटी आहेत, त्या नमुद केलेल्या आहेत. त्यातील काही अत्यावश्यक बाबी आपल्या निदर्शनास आणू देऊ इच्छितो की -

ईआयए अहवालानुसार प्रस्तावित प्रकल्प खुल्या समुद्रात सातपाटी, मुरबे आणि नांदगाव किना-यापासून जवळजवळ १० कि.मी. समुद्रात होत असून त्यापुढेही ९ कि.मी. इतका लांब व २७० मीटर रुंद इतका navigational channel साठी dredging प्रस्तावित आहे. समुद्रात १० कि.मी. लांब व १३०० मीटर लांब असे दोन ब्रेक वॉटर प्रस्तावित आहेत. मात्र ब्रेक वॉटर परिमाणाचे क्षेत्र अहवालात जाणूनबूजून नमुद केलेले नाही. फक्त लांबी नमुद केलेली आहे.

बंदर भागात माल हाताळणी व सुविधांसाठी सुमारे १३०० एकर भराव टाकण्यात येणार आहे. आजमितीपर्यत प्रकल्पाचा डीपीआर तयार झालेला नाही, सादर करण्यात आलेला नाही, फक्त दोन महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. दोन महिन्यात जर फायनल डीपीआर येणार होता, तर प्रारुप ईआयएवर जनसुनावणी का आयोजित करण्यात आलेली आहे? ईआयए अहवालात नमुद करण्यात आलेल्या अनेक बाबींमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

समुद्र क्षेत्राचे सर्वेक्षण करुन अंतिम डीपीआर दोन महिन्यात तयार होणार होता, तर प्रारुप ईआयएवर जनसुनावणी का आयोजित करण्यात आलेली आहे?

प्रस्तावित प्रकल्पामुळे मच्छिमारांचे होणारे नुकसान अंतिम डीपीआरमध्ये समाविष्ट करण्याची अट एमएमबीने घातलेली आहे. तर येथे प्रश्न - मासेमारीचे किती नुकसान होणार

आहे, मासेमारीचे किती क्षेत्र बाधित होणार आहे, ब्रेक वॉटर व भरावामुळे भरती ओहोटीवर किती परिणाम होणार आहे, किना-याजवळील गावांना किती धोका निर्माण होणार आहे, या बाबी ईआयए अहवालात का नमुद करण्यात आल्या नाहित, तसेच सीड्ब्लुपीआरएस सारख्या केंद्र शासनाच्या विभागाकडून अभिप्राय नसताना नागरिक प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना कशा उपस्थित करु शकतील?

ही जनसुनावणी अंतिम डीपीआर नंतर आयोजित करणे योग्य होते असे माझे मत आहे. तरी ही जनसुनावणी बेकायदेशीरपणे राबविली जात आहे असे माझे मत नोंदविण्यात यावे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

२२) **श्री जितेंद्र गंगाराम मेहेर, मुरबे, माजी पंचायत समिती सदस्य आणि सल्लागार, मुरबे जिंदाल बंदर विरोधी संघर्ष समितीः-**

जिंदाल कंपनीच्या माध्यमातून उभे राहणारे हे विनाशकारी बंदर आहे. येथे १६ बर्थ स्थापित करण्यात येणार आहेत, त्यापैकी तीन बर्थमध्ये घातक रसायने (hazardous chemicals), बल्क केमिकल्स आणि कोळसा उतरवला जाणार आहे. या सूक्ष्म कणांनी होणारे प्रदूषण आणि घातक रसायने उतरविताना होणारे जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण यामुळे होणारे धोके हे ईआयए अहवालात नमुद करण्यात आलेले नाहीत. हा ईआयए अहवाल खोटा आहे, त्यावर आधारित जनसुनावणी ही खोटी असून ती रद्द करण्याची आम्ही मागणी करत आहोत.

२३) **सौ. सीमा मिलिंद भोईर, सरपंच, सातपाटी ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा पालघरः-**

बैठकीतील सर्व मान्यवरांनी अपुर्ण असलेला ईआयए आणि अपूर्ण अहवालावरिल पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे असे वारंवार प्रतिपादन करुनही याबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती काहीही उत्तर देत नाही. तरी या बेकायदेशीर जनसुनावणीचे मी सरपंच सातपाटी व सर्व ग्रामस्थांतर्फे निषेध करते. यावर अध्यक्षा यांनी उत्तर द्यावे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या भावना, विचार, सूचना यांची नोंद घेण्यात आलेली आहे. भारत सरकारच्या पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआय़ए) अधिसूचना, २००६ नुसार ही जनसुनावणी कार्यान्वित असून उपस्थितांनी

उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येत आहे. सर्व अहवाल, इतिवृत्त पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेते. आपणास कायदेशीर मत मांडण्याचा अधिकार आहे.

२४) **श्री. समीर सुभाष मोरे, सरपंच, नांदगांव ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा पालघरः-**

दडपशाहीने बळाचा वापर करुन सुरु करण्यात आलेली जनसुनावणी मी लोकशाही जिथे सुरु होते त्या नांदगाव स्वराज्य संस्थेचा प्रथम नागरिक प्रस्तावित बंदराचा जाहिर निषेध करुन माझे म्हणणे मांडत आहे.

संपुर्ण खोटा व चुकीच्या अहवालानुसार हा प्रकल्प लादला जाणार असेल, तर शासनाने भांडवलदारांपेक्षा सामान्य नागरिक, शेतकरी, मच्छिमार, फळबाग पिकविणारे, फुलेफळे पिकविणारे, शुध्द हवा, पाण्याचा आग्रही असणारे नागरिक यांचा आदर करत मी मत मांडतो की येथे आलेल्या पाच हजार लोकांना कंपनी साधे पाणी देऊ शकत नाही, तर यांच्याकडून काय अपेक्षा करणार. पालघरच्या लोकांनी एमआयडीसीच्या कारखान्यातून होणारे जल वायू प्रदूषण, कर्करोग, त्वचा रोग का सहन करावा? अवघ्या २० कि.मी. अंतरावर वाढवण बंदर, टेक्स्टाईल पार्क, सगळे महाभयंकर प्रदूषण होऊनसुध्दा या प्रकल्पाचा घाट का घातला जातो?

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण असे म्हणते की सूक्ष्म जीवासही जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. जर खराखुरा सर्वेक्षण केला तर, खाड्या, विहिरी, बोअरवेल, शेतीची जमिन, फळबागांची पाहणी केली तर लक्षात येईल की तापमान, अतिवृष्टी, शेती होत नाही, फळे बेचव आहेत, हे सर्व विनाशी प्रकल्पाचा दुःष्परिणाम आहेत आणि असा विनाशकारी प्रकल्प आम्हाला ताजे मासे देणार आहेत काय? आम्हाला खुप-या, भोव-या, चिंबो-या, उड्या, वाड्डया, शिंपल्या, खेकडे, आम्हांला देणार आहेत काय? आम्ही येथील स्थानिक लोक, मच्छिमार वारंवार आपणास विनंती करत आहोत की, शुध्द पाणी, शुध्द हवा, हृदय बंद पाडणारा विनाशकारी जिंदाल प्रकल्प नको. रद्द करा, प्रकल्प रद्द करा.

२५) **श्री मिल्टन सौदिया, अध्यक्ष, मच्छिमार कृती समितीः-**

मा. महोदया, अनेक वक्त्यांनी अनेक मुद्दे सांगितलेले आहेत. कंपनीने जो पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला आहे, केंद्र सरकारने टी.ओ.आर पारित करताना जे निर्देश दिलेले आहेत, त्यांचे पूर्णपणे उल्लंघन करुन लोकांची दिशाभूल करुन अपुर्ण

अहवालावरच ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. मला वाटते जे अधिकारी कायदे पाळा असे जनतेस सांगतात, तेच अधिकारी बेकायदेशीर जनसुनावणी प्रक्रिया करत आहेत. मा. जिल्हाधिकारी महोदया, येथे आपल्यासह जे अधिकारी या बेकायदेशीर जनसुनावणीचे नियमन करत आहेत, त्यांच्याविरुध्द भारतीय न्याय संहिता, ३१८ अन्वये फसवणूक गुन्हा दाखल व्हायला हवा.

दुसरा मुद्दा - कंपनीने जो अहवाल सादर केलेला आहे, त्यात पान क्रमांक १४३ वर सूचना आहे की या प्रकल्पामुळे मत्स्य व्यवसायावर जो परिणाम होणार आहे, त्या परिणामांचे मुल्यांकन व्हायला हवे अशी सूचना Central Marine Fisheries Research Institute (CMFRI),Kochi, Kerala ने केलेली आहे. मला वाटते कंपनीने ती शिफारस डावलून खोटा दिशाभूल करणारा अहवाल येथील स्थानिकांना उपलब्ध करुन दिलेला आहे. माझ्या अगोदर अनेक वक्त्यांनी अनेक मुद्दे मांडलेले आहेत. तरी मी ते मुद्दे परत उपस्थित करत नाही.

माझी विनंती मा. जिल्हाधिकारी महोदयांना आहे की एकतरी माणूस दाखवा, जो या प्रकल्पाचे समर्थन करत आहे. जर सर्वांचाच विरोध या प्रकल्पास आहे, तर तो विरोध आपण बैठकीच्या इतिवृतात नमूद करुन घ्यावा.

२६) **डॉ. मंगेश सावंत, मुंबई-**

माझी डॉक्टरेट आयआयटी, मुंबई येथून रसायनशास्त्रात घेतलेली आहे. या प्रकल्पाबाबत सांगायचे तर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल कसा अपूर्ण आहे आणि कशी चुकीची आहे याची माहिती शनिवारी झालेल्या बैठकीत सांगितलेले आहे. त्या बैठकीत आम्ही सांगितले होते की आजची जनसुनावणी ही बेकायदेशीर असल्याने आजची जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी. आजही मी तेच सांगतो. आता प्रकल्पाच्या विरुध्द मी जे मुद्दे मांडत आहे, ते उपस्थितांना कळू द्यावेत.

ही जनसुनावणी अशासाठी आयोजित करण्यात आलेली आहे की प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरात जो संभाव्य पर्यावरणीय आघात होणार आहे, त्यासाठी प्रकल्प प्रवर्तक जो पर्यावरण व्यवस्थापन योजना राबविणार आहे, त्याबाबत प्रकल्प परिसरातील लोकांना अवगत करणे. ते सर्व शास्त्रीय उपाययोजना ईआयए अहवालात नमूद केलेल्या पाहिजेत, लोकांना त्या उपाययोजना कळल्या पाहिजेत. मात्र येथे वस्तूस्थिती तशी नाही.

टीओआरमध्ये जे चोवीस निर्देश देण्यात आलेले आहेत, ते येथे अयशस्वी होत आहेत. यात सर्वात महत्वाचे म्हणजे या प्रकल्पामुळे सातपाटी हे गाव सर्वात जास्त बाधित होणार असून त्याची लोकसंख्या सुमारे २५,००० ते ३०,००० हजार आहे. मच्छिमारी गाव आहे, मात्र या अहवालात सातपाटी गाव मच्छिमारींचा गाव म्हणून अशी कोणतीही नोंद करण्यात आलेली नाही.

पुढील मुद्दा - बंदर झाल्यास बंदर १०.० कि.मी. आहे. बंदराची ब्रेक वॉल ही १०.० कि.मी. अंतराची आहे. ज्यावेळी समुद्रास उधाण (surge) येते, वादळ येते, त्यावेळी सातपाटी व आजुबाजूचा परिसर किती प्रमाणात बाधित होईल व त्यावर उपाययोजना याबाबत कुठल्याही प्रकारचा अभ्यास करण्यात आलेला नाही.

पुढील मुद्दा - प्रस्तावित प्रकल्पामुळे समुद्रात किती क्षेत्र बाधित होईल, किती क्षेत्रामध्ये मच्छिमारांना मासेमारी करता येणार नाही, समुद्रातील किती क्षेत्र हे ड्रेजिंगमुळे नष्ट होईल याचा कुठेही उल्लेख नाही. म्हणजे त्याबाबत सर्व शास्त्रीय, सामाजिक अभ्यास व उपाययोजनांचा अहवालात उल्लेखच नाही. अत्यंत त्रोटक माहिती देण्यात आलेली आहे. ब्रेक वॉटर वॉलचे डिझाईन देण्यात आलेले नाही. उत्खनन किती होणार, किती भराव घातला जाणार, ब्रेक मटेरियल किती व कुठे टाकणार, ब्रेक मटेरियल टाकल्यामुळे समुद्रात किती प्रदूषण होईल, त्याचा मासेमारीवर कसा परिणाम होईल, मच्छिच्या उत्पादनावर कसा परिणाम होईल याची कुठेही नोंद नाही.

तसेच यामुळे जो मच्छिमार समाज बाधित होणार आहे, त्याबाबत कुठलाही शास्त्रीय, सामाजिक अभ्यास करण्यातच आलेला नाही याची नोंद घेण्यात यावी.

तसेच या मुरबे प्रकल्पापासून अंदाजे ७-८ कि.मी. अंतरावर वाढवण बंदर प्रस्तावित आहे. भारताच्या अणुउर्जा केंद्राच्या ५-६ कि.मी. अंतरावर मुरबे बंदर प्रस्तावित आहे. दोन्ही बंदरासाठी १० कि.मी. व ६.० कि.मी.च्या ब्रेक वॉल घातल्या जाणार आहेत. या दोन ब्रेक वॉल घातल्यामुळे तारापूर बंदराच्या समुद्रकिना-यावर shore lines वर कशा प्रकारचा परिणाम होईल, तारापूर अणुउर्जा प्रकल्पातून सोडावे लागणा-या गरम पाण्यामुळे परिणाम कसा होईल याचा शास्त्रीय अभ्यास करण्याची गरज असताना असा शास्त्रीय अहवाल येथे मांडण्यात आलेला नाही. लोकांची सुरक्षितता धाब्यावर बसवून, स्थानिक मच्छिमार, स्थानिक शेतकरी यांच्या उत्पन्नाचा, कुठल्याही प्रकारचा सामाजिक-आर्थिक अभ्यास न करता हा अहवाल तयार करण्यात आलेला आहे, ही अत्यंत खेदाची बाब आहे.

अध्यक्ष महोदया, आपणास मागच्या शनिवारच्या बैठकीत नमूद करण्यात आलेले होते की अशा अपुर्ण आणि चुकीच्या अहवालावर आपण जनसुनावणी आयोजित करण्यात येऊ नये अशी विनंती करण्यात आलेली होती. तरीही आपण ती आयोजित केलेली आहे.

दुसरी बाब आपण येथे सांगितले की येथे सर्वांच्याच मताचा आदर राखला जाईल. त्यांनी विरोधासाठी हात वर करण्याची सूचना केली. लोकांच्या भावना तीव्र आहेत. तरी हे मुरबे बंदर व वाढवण बंदर रद्द करण्यात यावे अशी मी स्थानिकांचा भावना शासनास सांगत आहोत.

२७) **श्री सत्यजीत विश्वनाथ चव्हाण, राजापूर, जिल्हा-रत्नागिरीः-**

टीओआर प्रमाणे हा अहवाल बनविण्यात आलेला नाही. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण व मा. सुप्रीम कोर्टाच्या विविध निर्देशांनुसार ही जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे. त्याबाबत आम्ही न्यायालयात दाद मागणारच आहोत. मात्र जिल्हा प्रशासन ही जनसुनावणी जबरदस्तीने चालू ठेवत असल्याने आम्हांला आमचे आक्षेप नोंदविण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. एक संवैधानिक कर्तव्य म्हणून आम्ही आमचे आक्षेप नोंदवित आहोत.

**मुद्दा क्रं. १-** टिओआर ची तारीख ११ जून २०२५ अशी दिलेली होती. तर इन्फ्रा समिती, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली येथे प्रकल्पाने १४-१५ मे, २०२५ ला टीओआर मंजूर करण्याची विनंती प्रकल्प प्रवर्तक यांनी केलेली होती. म्हणजे हा टीओआर भारतीय पर्यावरण इतिहासातील सर्वात जलद प्राप्त झालेला टीओआर आहे. म्हणजे अगदी तकलादू व सर्वात जलद प्राप्त झालेल्या टीओआरच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीच्या आपण अध्यक्षा आहात याचा आपण विचार करावा.

७७ व्या ईएसीच्या बैठकीत प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांची नाबेट मान्यता तारीख ही २७-०५-२०२५ एवढीच होती. तर ईआयए अहवालात प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी तारीख २० जून, २०२५ दाखविलेली आहे. म्हणजे २७ मे, २०२५ ते २० जून, २०२५ या कालावधीत पर्यावरण सल्लागार मे. बिल्डिंग एन्व्हॉयरमेंट (इंडिया) प्रा. लिमिटेड यांना नाबेट मान्यता (accreditation) नव्हती. मात्र याच कालावधीमध्ये म्हणजे ११ जुनला त्यांना टिओआर प्रदान करण्यात आलेला आहे. म्हणजे it is a gross violation from the EAC- Infra-I Committee.

ही जरी प्रशासकीय चूक असली, तरीही या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीस काहीही अर्थ नाही. कारण ज्या कालावधीत पर्यावरण सल्लागार यांना नाबेट मान्यता नव्हती,

त्याच कालावधीत पर्यावरण सल्लागारातर्फे सादर केलेल्या प्रकल्पास टीओआर मंजूर करण्यात आलेला आहे.

**<u>मुददा क्रं. २ –</u>** पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना सर्वेक्षण व अभ्यास ही संपूर्ण हंगामाचा (म्हणजे सर्व ऋतुंचा) करावाच लागतो. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी पहिले पूर्वावलोकन (preview) ३०-०६-२०२५ ला मप्रनि मंडळास सादर केले. म्हणजे येथे ११-०६-२०२५ ते ३०-०६-२०२५ – १९ दिवसातच पहिला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल मप्रनि मंडळास सादर करण्यात आला. तर पुढील अहवाल १८-०७-२०२५ म्हणजे ३८ दिवसात एवढ्या मोठ्या बंदराचा ईआयए तयार करण्यात आलेला आहे हे कोणालाही म्हणजे तो शास्त्रज्ञ असेल किंवा सामान्य नागरिक यांना पटणारे नाही. तरी त्यांच्या नाबेट मान्यता समितीची involvement in project from नोव्हेबर, २०२४ ते जुलै, २०२५ दिलेला आहे.

जर टीओआर ११ जुन, २०२५ ला प्रदान करण्यात आला, तर ६-७ महिने ते कशी कल्पना करत होते. याचा अर्थ प्रशासनाला गृहित धरण्याचे जिंदाल कंपनीची वृत्ति स्पष्टपणे दिसून येत आहे.

तसेच आमच्या स्थानिक बांधवांनी शनिवारच्या बैठकीत सांगितलेले आहे की ठाकूर कॉलेजने काढलेले ११ मे चे फोटो सर्वेक्षणाचे लावलेले आहेत. जर टीओआर ११ जुनला मिळाला, तर अगोदरच तेथील फोटो कसे काढले? याचा अर्थ जिंदाल कंपनीस विश्वास आहे हा सर्व फार्स असून आम्ही करु त्याप्रमाणे आम्हांला परवानगी मिळेल. याचा आम्ही निषेध करतो.

टीआरयु कोस्टल इंजिनियरिंग, मुंबई यांचा पान नं.६ वर डेटा आहे की तो ३२ कि.मी. चा घेतलेला आहे. तो valid नाही.

तसेच बंदरासाठी जे ड्रेजिंग होणार आहे, पान क्रं. ३९ वर जो आकडा दाखविण्यात आलेले आहे, तिकडची "eco-sensitivity, corals, bio-diversity याचा कसलाही अभ्यास केलेला नाही. जेथे संरक्षित भिंत बांधणार, तेथे जे मटेरियल्स टाकल्यामुळे होणा-या प्रदूषणाचा अभ्यास केलेला नाही.

प्रकल्प सुरु झाल्यानंतर १५० कायम रोजगार व ४५० कंत्राटी लोकांना रोजगार देणार आहेत. म्हणजे फक्त ६०० लोकांना रोजगार मिळण्यासाठी मच्छिमारांनी आपला समुद्र का द्यावा?

..//

पर्यावरण आघात मुल्याकंन अहवाल हा कॉलेजचा संशोधन पुस्तिकेप्रमाणे आहे. मात्र या अहवालात मान्य करण्यात आलेले आहे की प्रकल्प परिसरात जल, हवा प्रदूषण आहे.

येथे बरेच प्रदूषणकारी प्रकल्प कार्यरत असून वाढवण बंदर विस्तार प्रस्तावित आहे. भविष्यात पालघर जिल्हयाचा समावेश एमएमआरडीएत (MMRDA-Mumbai Metropolitan Region Development Authority) करुन नवी मुंबईप्रमाणे महामुंबई म्हणून विकसित करण्यात येणा-या क्षेत्रात होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे तुकड्यातुकड्याने पर्यावरण आघात मुल्यांकन उपयोगाचे नाही. तर पालघर तालुक्याचे Cumulative Impact Assessment of West Coast of Palghar District असा अभ्यास केला गेला पाहिजे. तरी ही जिंदालचा प्रकल्प स्थानिकांना व इतर जिल्हयातील नागरिकांना नको आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

२८) **श्री अजिंक्य मिलन देव, राहणार-मुरबे, तालुका, जिल्हा-पालघरः-**

बैठकीत प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण करताना सांगितले की प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर १५० लोकांना कायम रोजगार व ४५० कंत्राटी लोकांना रोजगार देणार आहेत. म्हणजे ६०० लोकांना रोजगाराची संधी मिळणार आहे. तर मी बैठकीत सांगू इच्छितो की आमच्या सातपाटी व मुरबे क्षेत्रात ४००-५०० छोट्या व मोठ्या बोटी आहेत. एका बोटीमागे पंधरा लोक कामाला आहेत. म्हणजे ४००-५०० बोटींमागे जवळजवळ ७,५००-८,००० लोकांचा रोजगार हिसकावून फक्त ६०० लोकांना रोजगार देऊन काय साध्य करणार आहात?

तरी माझी विनंती पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस आहे की वरिल मुद्दे आपण प्रकल्प प्रवर्तकांना विचारले पाहिजेत. ८,००० लोकांना देशोधडीला लावून आपण कोणाकोणाला मोठे करणार आहात? सामान्य माणसांना, ८,००० लोकांना देशोधडीला लावून जिंदालला मोठे करणार आहात का त्यांच्या दलालांना मोठे करणार आहात? याचे उत्तर देण्यात यावे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

२९) **श्री. राजीव चौधरी, जिल्हा पालघरः-**

मा. महोदया, आपण जिल्हाधिकारी आमच्या जिल्ह्याच्या पालक आहात. ही जनसुनावणी बेकायदेशीर आहे. येथे सर्व वक्त्यांनी ही जनसुनावणी बेकायदेशीर आहे असे सांगितलेले आहे, तर ही कशी बेकायदेशीर आहे हे मी सांगतो.

मी अशा गावात राहतो की तेथे भिंतीवर लिहिलेले आहे की – पाणी गाळा, नारु टाळा. येता कणकण तापाची, करा तपासणी रक्ताची. शासन सर्वसामान्य माणसांना समजाविण्याचा प्रयत्न नेहमीच करत असते. आणि कंपनीचा जो पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल उपलब्ध केलेला आहे. त्यांनी त्यातील तांत्रिक भाषेतील उत्तर वाचून दाखविले. त्यांनी मत मांडले की आम्ही सामान्य माणसे आहोत. आम्हांला अहवालातील ती भाषा कळत नाही.

तरी आपणास विनंती आहे की ही जनसुनावणी सहा महिने पुढे ढकला.

त्यांनी पुढे सांगितले की जेएसड्ब्लु ही बेजबाबदार कंपनी आहे. कारण जेएसड्ब्लु चा एक प्रकल्प रत्नागिरीला आहे. तेथे मोलॅसिसचे टॅंक बनविले गेले. २०१३ पर्यत कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही. त्यासाठी कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही. एमपीसीबीने जरी कारवाई केली, तरी प्रकल्प पुन्हा चालू झाला.

**दूसरी घटना –**

गोवा प्रदूषण नियंत्रण मंडळाने जेएसड्बल्युच्या कोळसा हाताळणीवर बंदी घातली. साडेचार लाख मे.टन कोळशाची परवानगी मिळालेली होती, पण त्यांनी दहालाख मे.टन कोळशाची वाहुतक केली आणि त्यामुळे गोवा क्षेत्रात कोळशाचे प्रदूषण वाढले. त्यामुळे गोवा प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्याची मान्यता रद्द केली. नंतर परत परवानगी मिळाली.

**तिसरी घटना –**

जयगडचे जे बंदर आहे, त्याच्या बाजूला एलपीजीचा एक टॅंक आहे. तेथील गॅस लिक झाला, जवळजवळ ६० मुलांना त्याची बाधा झाली. काही लोकांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दुस–या दिवशी पोलिसांनी कलम २८६ अन्वये गुन्हा दाखल केला. नंतर परत प्रकल्प चालू झाला.

अशा मालकांच्या ताब्यात आपण आम्हांला देणार का?

मुद्दा नं.२

प्रकल्प प्रवर्तकांनी कामगारांसाठी सूर्या प्रकल्पातून पाणी मंजूर केलेले आहे. पण या आदिवासीबहूल जिल्ह्यात विविध गावातील माहिती मिळविल्यास असे दिसून येते की ६०% पाणी सरकारी नियमांप्रमाणे देण्यात येते. जर प्रकल्पास पाणी दिले, तर आम्हांला पिण्याचे पाणीसुध्दा मिळणार नाही.

मुद्दा नं.३ -

तसेच जेएसड्ब्लुमध्ये लिक्विड बर्थ आहे. त्याचा LSIR - Location Specific Individual Report म्हणतो की जेएसड्ब्लुच्या लिक्विड बर्थवर ११० लोकांनी वर्षभर काम केले, तर त्यातील एक माणूस मृत्यूमुखी पडणार. असे स्पष्ट दिले, तर त्या प्रकल्पास परवानगी द्यायची का?

मुद्दा नं, ४ -

कंपनीने १० कि.मी. ची ब्रेक वॉल बांधलेली आहे. त्यामुळे पाणी थांबणार. पाणी थांबल्यामुळे पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण कमी होणार. त्यामुळे तेथील मासे हे दुसरीकडे जाणार, येथील क्षेत्रात मासेमारीचे प्रमाण कमी होणार.

ब्रेक वॉलमुळे सेडिमेन्टेशन होणार, त्यामुळे तेथे गाळ तयार होणार. हा गाळ जर सातपाटी खाडीत गेला, तर खाडी अरुंद होणार, उथळ होणार. सातपाटीमध्ये ३००-४०० बोटी मासेमारी करतात, त्यांच्या मासेमारीवर परिणाम होणार आहे.

सातपाटी हे गावं संपूर्ण जगात पापलेटच्या फिशिंगसाठी प्रसिध्द आहे. पापलेटला राज्यमासा हा दर्जा मिळालेला आहे. त्यामुळे सातपाटी गाव हे करोडो रुपयांचे उत्पादन करते. सातपाटीच्या ३००-४०० बोटींमुळे हजारो लोकांना जेवणाची रोटी मिळते.

भविष्यात मुरबे प्रकल्पामुळे घातक रसायने, खते यांची वाहतुक होणार. ती रसायने शेतात पडली तर शेती नष्ट होईल. यामुळे आमच्या गावातील लोकांना आरोग्याशी सामना करावा लागणार आहे.

२६ जुलै, २०२५ रोजी सातपाटीमध्ये ५.७ मीटरची भरती होती. त्यापेक्षा मोठ्या भरत्या येतात. पण पाऊस व वा-यामुळे अनेक घरात पाणी शिरले. ओहोटीमुळे ते पाणी परत जात नाही. पाणी घरात मुरल्यामुळे घरे पडणार आहेत. तर प्रश्न विस्थापनाचा आहे.

त्यातील काही घरे ही शौचालयासारखी आहेत. जेएनपीएमध्ये विस्थापित झालेल्यांना पर्यायी एक हजार एकर जमिन दिलेली आहे, पण सीआरझेडमध्ये येत असल्याने काहीही झालेले नाही.

जेएसड्ब्लु प्रकल्प हा एका माणसाचा प्रकल्प आहे. एका माणसाच्या फायद्यासाठी हजारो लोकांचे घरे उध्वस्त करु नका ही विनंती.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

३०) **<u>श्री सचिन चव्हाण, राहणार-मुंबई व देवगडः-</u>**

**मुद्दा क्रं.१-** ज्या बैठकीत हा टीओआर संमत झाला, त्या ईआयए समितीत एक सद्ग्रहस्थ होते कर्नल (निवृत्त) प्रकाश तिवारी. हे प्रकाश तिवारी जिंदालच्या जॉईंट सीएसआर फंड विभागाचे व्हॉईस प्रेसिडेंट होते. अजून आहेत की नाही हे माहित नाही. येथे Conflict of Interest येतो. त्यामुळे पारित टीओआर हा त्वरित रद्द करण्यात यावा. पहिली मागणी.

**मुद्दा क्रं. २** -टिओआर प्राप्त होण्यापूर्वी सर्वेक्षण करण्यात आले. तर सर्वेक्षण करणा-यांना टीओआरमधील अटी व शर्ती या कशा कळल्या? हा Conflict of Interest होता. म्हणून टीओआर हा त्वरित रद्द करावा. त्यामुळे प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालही त्वरित रद्द करण्यात यावा. टीओआरमधील पारित अटी व शर्ती या योग्य नाहीत. सर्व निकष लावले नाहीत, कारण Conflict of Interest होता.

**मुद्दा क्रं. ३** – पहिल्या अटी व शर्तीमध्ये म्हटले आहे -

ToR require mangroves, CRZ-1 areas be excluded from the port site -

त्याचे उत्तर जिंदालच्या ईआयए मध्ये दिलेले आहे - EIA only claims minimum impact.

या दोन्ही एकमेकाशी सुसंगत नाही. कारण असा वेळोवेळी आरोप करण्यात आलेला आहे की जिंदाल हा खारफुटीचे serial killer आहे. हे चुकीचे ठरणार नाही. कारण महाराष्ट्र राज्याच्या रायगड जिल्हयात डोलवी प्रकल्पात एन.जी.टी. ने एक कोटी एकशष्ट लाखांचा दंड लावलेला आहे. त्याशिवाय धरमतर प्रकल्पाच्या ठिकाणी त्यांनी बावीस हेक्टरमधील खारफुटी बाधित केले हे वृत्तपत्रात आलेले आहे.

तरी जिंदालला या अटी व शर्तीतून वगळणे ही मोठी चूक होईल.

**मुद्दा क्रं. ४ -** सागरी पर्यावरणशास्त्र आणि जैवविविधता:- (Marine Ecology & Bio-diversity):-

येथे उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात सातपाटी गाव हे जाणूनबूजुन वगळण्यात आलेले आहे. तर जिंदालच्या ईआयए मध्ये जी मांडणी केलेली आहे, त्या मांडणीतील जो डेटा घेतलेला आहे, तो आहे जनगणना २०१६ चा. तर त्या शासकीय डेटातून घेतलेली गावे ही प्रस्तावित मुरबे बंदरापासून खूप दूर आहेत. जवळची गावे म्हणजे सातपाटी गाव व दांडी गाव. या दोन्ही गावांचा कुठेही उल्लेख केलेला नाही. या दोन्ही गावातील मच्छिमार बांधवांचा एकत्रित विचार केल्यास ते ४,५०० पेक्षा जास्त आहेत, २०१६ च्या जनगणनेनुसार. अशा प्रकारचा घोर निष्काळजीपणा (gross negligence) पर्यावरण सल्लागार यांनी केलेला आहे. कारण येथे Conflict of Interest.

दुसरी गोष्ट या प्रकल्पात दोन ब्रेक वॉटर वॉल बांधण्यात येणार आहे. त्यातील एक आहे १० कि.मी. लांबीची. येथे पर्यावरण सल्लागार यांनी चॅप्टर २ मध्ये ब्रेक वॉटर वॉलचा नकाशा दिलेला आहे. तो पाहिला तर लक्षात येईल त्याचे आकडे एवढे लहान आहेत की ते वाचताच येत नाहीत. जर नकाशा वाचताच येत नसेल किंवा चुकीचा असेल तर ईआयए हा बाजूलाच ठेवायला हवा.

ही ब्रेक वॉटर वॉल कशी बांधणार, त्याच्यासाठी किती ड्रेजिंग करणार याबाबतची माहिती ही कुठेही दिलेली नाही.

ब्रेक वॉटर वॉलचा नकाशा हा वाढवण बंदराच्या ब्रेक वॉटर वॉलशी तुलना केली असता जिंदालच्या नकाशात पोर्ट लिमिट जाणीवपूर्वक कुठेही दिलेले नाही.

ज्यावेळी पोर्ट लिमिट दिले जाते व सागरी प्राधिकरण मंडळास ते हस्तांतरित करण्यात येतात, त्यावेळी कुठल्याही मच्छिमाराच्या नौकेला आत जाता येत नाही. जिंदालने ते दाखविलेले नाही कारण त्यांना वरदहस्त होता conflict of interest.

दुसरी गोष्ट जिंदाल बंदराजवळ प्रथम रिक्लमेशन नंतर ब्रेक वॉटर वॉल. वाढवण बंदर व जिंदाल बंदर या दोन्हीमधील ३० कि.मी. समुद्र हा मच्छिमारांसाठी निषिध्द होतो, त्याचा अभ्यास करण्यात आलेलाच नाही. तसेच सातपाटी बंदरात juvenile fish वेगवेगळ्या

प्रकारचे आहेत. बाणगंगा नदी ही estuary पासून किती लांब आहे याचा कोठेही उल्लेख नाही.

तसेच ब्रेक वॉटर वॉलमुळे सेडिमेंट्स, वाळू शिरणार, त्याचा अभ्यास व नोंदी करण्यात आलेल्या नाहित.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. इतर वक्त्यांना बोलायचे असल्याने थोडे संक्षिप्त मुद्दे मांडावेत ही सूचना करण्यात आली.

श्री सचिन चव्हाण यांनी फक्त महत्वाचे मुद्देच मांडत असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले सातपाटी येथे विविध juvenile fish हे गुजरात वेरावळहून येतात. ब्रेक वॉटर बांधल्यानंतर ते कसे येणार? ग्रीन ट्रॅफिक हा विषयच नाही येत पर्यावरण सल्लागारांच्या, त्यामुळे हा ईआयए हा सदोष आहे.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**३१) श्री. सतीश तन्नुर, उपसरपंच, आलेवाडी, तालुका, जिल्हा पालघरः-**

जनसुनावणी सुरु झाल्यापासून सर्वच वक्ते ईआयए अहवाल कसा चुकीचा आहे याबाबत माहिती देत आहेत. आम्ही आमच्या हरकती मांडत आहोत. तांत्रिक मुद्दा सोप्या भाषेत सांगत आहे. तुमच्या समोर पाण्याचा पेला आहे. त्यात खडा टाकल्यास त्यातील पाणी बाहेर येणारच. तसेच समुद्रात बोट उभी केल्यानंतर पाण्याचा प्रवाह बाहेर येणार आहे. त्यामुळे आमचे राहणीमान धोक्यात येणार आहे. जिंदाल सांगतो की या प्रकल्पामुळे तुमचा विकास करतो.

तर मा. अध्यक्षा, जिंदालला सांगा की आमचा विकास आम्ही करत आहोत. आम्ही दिवसभर काम करतो, घरी रात्री भाजी नसेल तर आमचे मच्छिमार समुद्रावर जातात, जाळे टाकतात व मच्छी आणतात. हा प्रकल्प आल्यास ती मच्छी राहणार आहे काय?

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३२) **श्री सुमीत रविंद्र ठाकूर, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत नांदगाव तर्फे तारापूरः-**

सदरहू जनसुनावणी ही कशी सामाजिक, पर्यावरणीय व राष्ट्रीय सुरक्षिततेनुसार कशी बेकायदेशीर आहे याचे सात मुद्दे मी सांगत आहे.

<u>मुद्दा नं. १-</u>

प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रस्तावित प्रकल्पासाठी सादर केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा अपुर्ण, त्रुटीपूर्ण, दिशाभूल करणारा आहे. कारण या अहवालासाठी आवश्यक असणारे सर्वेक्षण हे पूर्ण झालेले नाही. स्थानिकांनी सर्वेक्षणास विरोध केल्याने सर्वेक्षण मध्येच थांबविण्यात आले. त्यामुळे अपूर्ण सर्वेक्षण अहवालावर घेतलेला निर्णय हा ग्राह्य धरता येणार नाही.

यात पर्यावरणीय परिणाम म्हणून वृक्षतोड एवढा मर्यादित दाखविलेला आहे. भूमीवरिल परिसंस्था, किनारी जलस्त्रोत, समुद्री जैवविविधता व मासेमारी केंद्रातील व्यापक परिणाम याचा अपूर्ण अभ्यास आणि आढावा घेण्यात आलेला नाही.

<u>मुद्दा नं. २ - पर्यावरणातील त्रुटी-</u>

पर्यावरण (संरक्षण) १९८६ व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प सुरु करणेअगोदर प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करणे त्यासाठी प्रकल्प परिघात सर्वेक्षण करणे अनिवार्य आहे. पर्यावरणीय तत्व व सार्वजनिक न्याय याचे भंग होत आहे. त्यामुळे संवैधानिक तत्वाचे भंग होत आहे.

<u>खारफुटीचा नाशः-</u>

या प्रकल्पामुळे खारफुटीचा नाश होण्याची जास्त शक्यता आहे. ती संरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

<u>पुनर्वसन योजनाः-</u>

विस्थापित झालेल्यांना पुनर्वसन योजना तयार करुन सादर केलेली नाही. विस्तापितांसाठी पर्यायी रोजगार, निवास व सुरक्षितता याबाबत माहिती दिलेली नाही.

<u>स्थानिक मच्छिमार व शेतक-यांवर होणारा परिणाम-</u>

प्रस्तावित प्रकल्पामुळे मासेमारीवर प्रत्यक्ष परिणाम होणार आहे. त्यामुळे मच्छिमार समाज ही उध्वस्त होणार आहे.

बंदर बांधल्यामुळे समुद्राचे पाणी किना-याजवळील शेतात गेल्याने शेती उध्वस्त होईल.

**राज्यघटना कलम २१** – राज्यघटना कलम २१ नुसार पारंपारिक हक्क संरक्षित केलेले आहेत.

या प्रकल्पामुळे स्थानिक लोकांचे उपजिविकेचे साधने नष्ट होतील, त्यामुळे तो भारतीय राज्य घटना २१ चा भंग आहे. तरी सदर प्रकल्पास माझा विरोध आहे.

**राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी धोकाः-**

जेएसड्ब्लु पोर्ट हे तारापूर पोर्ट व तारापूर अणुउर्जा केंद्राजवळ उभारल्यास ते राष्ट्रीय सुरक्षितेसाठी धोकादायक आहे. नांदगांव आलेवाडी येथे प्रकल्प येणार होता, तो संरक्षित क्षेत्रामुळे बंद करण्यात आला. तसेच भारताचे वाढवण बंदर हे विकसित होत आहे. त्यामुळे मुरबे बंदराची आवश्यकताच नाही.

रासायनिक सांडपाणी प्रदूषण, जलप्रदूषणामुळे जी नुकसानभरपाई होईल त्याबाबत काहीही अभ्यासण्यात आलेली नाही.

माझा जिंदाल प्रकल्पास जाहिर विरोध आहे.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**३३) श्री संतोष तांडेल, राहणार-मुरबे, तालुका, जिल्हा पालगर, मुरबे जिंदाल बंदर विरोधी समिती सल्लागारः-**

माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी ही जनसुनावणी व सादर करण्यात आलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल कसा बेकायदेशीर आहे, अहवालात अनेक त्रुटी असतानाही सामान्य जनतेस अंधारात ठेऊन जनसुनावणी ही दडपशाहीने बैठक चालू ठेवलेली आहे. मी तीन बाबींवर लक्ष वेधणार आहे-

प्रस्तावित प्रकल्पाचे परिणाम म्हणजे देशाची सुरक्षितता, लोकांचे आरोग्य आणि स्थानिकांच्या उदरनिर्वाहावर होणारा परिणाम.

**देशाची सुरक्षितताः-**

या मुरबे शेजारीच अणुशक्ती केंद्र आहे. त्याच्या बाजूलाच वाढवण बंदर होत आहे. मुरबे बंदर झाल्यास अनेक मालवाहतुक जहाजे येथे येतील. आपले शत्रु येऊ शकतात.

--

आपण २६-११ चा अतिरेकी हल्ला पाहिला असेल. आपले शत्रु समुद्रमार्गे येतात व आपल्यावर हल्ला करतात. या प्रकल्पामुळे भारताच्या सुरक्षिततेवर परिणाम होणार आहे.

शिवाजी महाराजांनी साडेतीनशे वर्षांपुर्वी समुद्रावरुन येणा-या शत्रुचा धोका ओळखला व येथे किल्ले बांधले. मात्र स्वतंत्र भारतात काही भांडवलदार, धनदांडग्यांसाठी सरकार बंदर बांधण्यास परवानगी देऊन सामान्य माणसांची सुरक्षितता धोक्यात घालत आहे.

**<u>आरोग्यावर परिणामः-</u>**

आमच्या शेजारी तारापुर एमआयडीसी आहे. अणुशक्ती केंद्र आहे. त्याचे रेडिएशन व प्रदूषणामुळे स्थानिकांना गंभीर आजार जडलेले आहेत. परिसरातील तरुण मुले-मुली कॅन्सरमुळे, ह्रदयविकारामुळे मरत आहेत.

**<u>उदरनिर्वाहाचा प्रश्नः-</u>**

या प्रकल्पासाठी १,५०० एकर समुद्र क्षेत्रात भराव टाकणार आहेत. त्यामुळे तेथील व परिसरातील क्षेत्र हे बाधित होणार आहे. त्यामुळे तेथील मच्छिमार व त्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबे ही मासेमारी न मिळाल्याने विस्थापित होणार आहेत, उध्वस्त होणार आहेत.

काही दिवसांपूर्वी आमच्या मच्छिमारी बोटीला एक मालवाहू बोटीने धडक दिली. स्थानिक मच्छिमारी बोटीचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यास एक पैशाची शासनाने भरपाई अजूनही दिलेली नाही.

तरी प्रस्तावित प्रकल्पामुळे आमच्या उदरनिर्वाहावर, आरोग्यावर गंभीर परिणाम होणार आहेत. शासनाच्या योजना या कागदावरच राहतात, प्रत्यक्ष बाधित व्यक्तीला मिळतच नाहीत. स्थानिक भूमीपुत्र देशोधडीला लागणार आहे याची गंभीर दखल प्रशासनाने घ्यावी ही विनंती.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३४) **<u>ज्योती राजेश मेहेर,अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघः-</u>**

जे पूर्वीच्या वक्त्यांनी सांगितले, तेच मी सांगत आहे की ईआयए अहवाल अपूर्ण असताना आणि मच्छिमारांचा सीएमएफआयआर सर्वेक्षण मच्छिमारांबाबत झालेला नसताना आपण आयोजित केलेली पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे. सर्वांनाची

मागणी केली की ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी, मात्र आपण ती दडपशाहीने पुढे नेत आहेत. तरी मी काही मुद्दे उपस्थित करत आहे -

**मुद्दा क्रं. १ -**

२५ ऑगस्ट, २०२५ रोजी आपणच एक जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. पालघर जिल्ह्यातील मुरबे येथील जिंदाल बंदर प्रकल्पाबाबत माहिती जनतेला देण्यात आलेली होती. त्यानुसार मुरबे ग्रामपंचायतचा या प्रकल्पास विरोध आहे, याबाबतचे निवेदन आपणास सादर करण्यात आलेले होते. तरीही आपण जनसुनावणी ही आयोजित केली असुन सर्वांनी ही बेकायदेशीर जनसुनावणी रद्द करण्याची मागणी करुनही आपण ती चालू ठेवलेली आहे.

**मुद्दा क्रं. २-**

ईआयए अहवालात सातपाटी गांव नमुदच केलेले नाही. अत्यंत संवेदनशील गाव आहे. समुद्राचे पाणी आजही अर्ध्या गावात शिरते. जे १००% मासेमारीचे गांव असुनही त्या गावाचा उल्लेख जाणूनबुजून अहवालात करण्यात आलेला नाही. सातपाटी गावाची लोकसंख्या जवळजवळ तीस हजार आहे. आम्हांला तुम्ही ग्रहित धरणार नसाल, तर ते पुर्णपणे चुकीचे आहे. ईआयए अहवालच चुकीचा आहे. तो प्रथम दुरुस्त करण्यात यावा, नंतरच परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी ही स्थानिकांना मागणी केलेली आहे.

बैठकीत अनेक वक्त्यांनी सांगितलेले आहे की जेएसडब्ल्युने नांदगावलाच प्रथम बंदर बांधावयाचे होते. त्यावेळी जी जनसुनावणी झाली, त्यावेळी २५,००० लोक उपस्थित होते. तरी ती जनसुनावणी कार्यान्वित ठेवली. आमच्या मच्छिमार बांधवांनी यास राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात आवाहन दिले. एनजीटीने निर्णय दिला की मच्छिमारांचे १००% नुकसान होणार असल्याने मच्छिमारांना दरवर्षी १३० कोटी नुकसान भरपाई दिली पाहिजे. जिंदालने सुप्रीम कोर्टात आवाहन केले की एवढी नुकसान भरपाई मी दरवर्षी देऊ शकत नाही आणि माघार घेतली. तोच प्रकल्प हा दीड कि.मी. मुरब्याच्या बाजूला सरकत आहे. त्यावेळेस माघार घेतलेली असतानाही कंपनी प्रशासनास हा प्रकल्प परत मुरब्यासाठी कशासाठी बांधता आहात हा प्रश्न आम्ही विचारत आहोत.

प्रस्तावित प्रकल्पासाठी समुद्रात १६५ एकर जमिनीत भराव टाकून जमिन उभी करणार आहेत. बंदरास पायाभूत सुविधा देण्यासाठी रेल्वे, वाहनतळ यासाठी सातपाटी गावात अतिरिक्त जमिन घेण्यात येणार आहे. आमच्या उपजिवीकेचे एकमेव साधन आहे, ते म्हणजे मासेमारी, ती या प्रकल्पामुळे बाधित होणार आहे.

या जिंदाल प्रकल्पास आमचा सर्वांचाच विरोध आहे.

पर्यावरणाचा विचार केला तर प्रस्तावित बंदर हे सीआरझेड-१, २, ३, ४ व सीझेडएमपीच्या कक्षेत येत आहे. त्याठिकाणी बांधकामासच परवानगी नाही.

तेथील खारफुटीची झाडांची कत्तल करुन मीठागरांची जागा प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यात येणार आहे. या बंदरासाठी जी १० कि.मी. ब्रेक वॉटर वॉल बांधण्यात येणार आहे, त्यामुळे समुद्राचे पाणी कोणत्या दिशेला जाईल, कोणत्या जाणार नाही याचा उल्लेख अहवालात नाही.

भविष्यात प्रस्तावित बंदराचे विस्तारिकरण नाकारता येत नाही. त्याचे दूरगामी परिणाम आम्हांला भोगावे लागणार आहेत. सातपाटी हे गाव मासेमारीसाठीच प्रसिध्द आहेत. येथे विविध माशांची विपुलता आहे. बंदरामुळे सातपाटी गावाबरोबरच आजूबाजूची मासेमारी ही नष्ट होईल. त्याचा परिणाम सातपाटी गावाबरोबरच इतर परिसरात होणार आहे.

या बंदरामुळे माशांचे प्रजजन ठिकाणे नष्ट होतील, त्यामुळे माशांच्या उत्पादनावर परिणाम होणार आहे. पारंपारिक मच्छिमारांच्या उपजिविकेवर प्रश्न निर्माण होणार आहे. पारंपारिक मासेमारी ही भरती ओहोटी प्रवाहावर अवलंबून असते. बंदराच्या बांधकामामुळे भरती ओहोटीचे प्रवाह व हालचाल बदलते.

तरी विनंती आहे की हे बंदर रद्द करण्यात यावे आमच्या अर्थव्यवस्थेचा आणि संस्कृतीचा कणा असलेला पारंपारिक मासेमारीचे नुकसान कोणत्याही फायद्यापेक्षा जास्त आहे. हजारो लोकांचे जीवनमान, स्थानिक अन्नसुरक्षा, पर्यावरण संतुलन हे धोक्यात आहे. तरी हा प्रकल्प रद्द करण्यात यावा.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३५) **प्रज्ञा हेमंत तरे, सदस्य, ग्रामपंचायत मुरबे, तालुका, जिल्हा- पालघरः-**

माझे जिल्हाधिकारी महोदया यांना भावनिक आवाहन आहे की आपले पद, प्रतिष्ठा बाजूला ठेवून पालघरच्या पालक म्हणून विचार करावा. एकीकडे भल्यामोठ्या वाढवण बंदराचा घाट टाकला जातो, तर नजिकच अतिसंवेदनशील भारताचे अणुशक्ती केंद्र आहे. आता जिंदाल बंदर प्रस्तावित आहे. भविष्यात केळवे येथे टेक्सटाईल पार्क नियोजित आहे. या सर्व विनाशकारी प्रकल्पाचा एकत्रितपणे विचार केल्यास मोठ्या प्रमाणात समुद्र क्षेत्र व्यापले

जाणार असून त्यामुळे स्थानिक मच्छिमारांचे नुकसान होणार आहे. याचे आपण आत्मचिंतन करावे. जिंदाल बंदराचा प्रकल्प जबरदस्तीने राबवू नये. जिल्ह्याच्या पालक या नात्याने आपण तुमच्या आमच्या मुलांचा विचार करावा. भारताची जबाबदार नागरिक म्हणून जबाबदारी स्विकारुन विनाशकारी प्रकल्प शासनाने लादू नये ही विनंती करते आणि या प्रकल्पास विरोध करते.

एक महत्वाचा मुद्दा बैठकीत मी उपस्थित करते की ३ ऑक्टोबर च्या शासन निर्णयात आपले पत्र होते की "मच्छिमारांचे पुनर्वसन" हा शब्द होता. तर पुनर्वसन हा शब्द का वापरण्यात आला, याचा अर्थ आम्हा स्थानिकांना हाकालण्याचा प्रयत्न आहे का? याबाबत आपण स्पष्टीकरण द्यावे.

प्रस्तावित प्रकल्पास माझा विरोध आहे.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**३६) <u>श्री मनिष मनोहर पाटील, राहणार-मुरबे, तालुका, जिल्हा पालघर, सदस्य, मुरबे जिंदाल बंदर विरोधी संघर्ष समितीः-</u>**

एक सर्वसामान्य नागरिक म्हणून मी बोलत आहे. ही जनता फक्त विरोधासाठी आलेली आहे. याची दखल आपण निश्चितच घ्यायला पाहिजे. प्रत्येकाने प्रत्येक मुद्दे आपल्यासमोर मांडलेले आहेत. येथे आलेला प्रत्येक माणूस हा जिंदालला विरोध करण्यासाठी आलेला आहे. प्रत्येकाने जनसुनावणी ही "बेकायदेशीर" आहे हा शब्द वापरलेला आहे. हे जीवंत उदाहरण आपल्यापुढे आहे. येथे येण्यापुर्वी जनतेला असे सांगण्यात आले की येथे पाण्याची, खाण्याची सोय करण्यात आलेली आहे. मात्र येथे त्यांना पाणीसुध्दा मिळालेले नाही. अध्यक्षा, आपण येथे लोकांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नांसाठी येथे बसलेल्या आहात. सर्वांनी मुद्दे मांडलेले आहेत. येथे आलेली जनता आपल्याकडे न्याय मागण्यासाठी आलेली आहे. येथील शेतकरी, मच्छिमार व त्यावर अवलंबून असणारे अनेक लोक बाधित होणार आहेत. बोटी येण्या-जाण्यासाठी जो मार्ग समुद्रात बनविणार आहेत, त्यामुळे आमची शेती ही पूर्णपणे बाधित होणार आहे. भराव टाकल्यानंतर भरतीच्या वेळी समुद्राचे पाणी आमच्या शेतात येणार आहे. त्यामुळे शेती ही पूर्णपणे बाधित होणार आहे. आमच्या वाडवडिलांनी दिलेली पारंपारिक शेती नष्ट झाल्यानंतर आम्ही कोणाकडे जायचे?

मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रश्न विचारत आहे की प्रस्तावित प्रकल्प स्थानावर आपण पाहणी केली का, तेथे सर्वेक्षण केले आहे का? तरी ही बेकायदेशीर जनसुनावणी त्वरित रद्द करण्यात यावी.

३७) **<u>श्री मिसान यशवंत नाईक, तालुका प्रमुख, महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती आणि संचालक, खारेकुरण मच्छिमार सहकारी संस्थाः-</u>**

आम्ही येथे माहिती घेतली, त्यावेळी कळले की २००० पेक्षा जास्त आपल्या भगिनी येथे बैठकीसाठी आलेल्या होत्या. ते काळे कपडे घालून आलेले होते, म्हणून त्यांना पोलिसांनी आत सोडले नाही. म्हणून त्या दुस-या रंगाचे कपडे घालून येथे आलेल्या आहेत.

कंपनी जो ब्रेक वॉटर वॉल कंपनी बांधणार आहे, तो शंकराच्या मंदिराकडून दहा कि.मी. पुढे जाणार आणि मधली जी खाडी आहे, त्या खाडीत मोठ्या प्रमाणातील पाणी हे खारेकुरण, मुरबा खाडीपासून कुंभवली पर्यंत पुढे जाईल, मात्र एक आठवण करुन देतो की करोना काळात या खाडीत रोज ३,०००-४,००० लोक चिंबो-या, शिंपल्या गोळा करण्यास जात होते. आम्ही शिंपल्या वाड्डे, चिंबो-या, निवट्या हे खाऊन करोना काळात आमची रोगप्रतिकार शक्ती (immunity power) वाढविलेली आहे. त्यामुळे आजपण आम्ही जीवंत आहोत. मा. जिल्हाधिकारी महोदया, हे खाऊन आमची रोगप्रतिकार शक्ती (immunity power) वाढविली.

आता प्रकल्प प्रवर्तकांनी जर ब्रेक वॉटर वॉल बांधली व पाणी वाढले, तर हे मासे आम्हांला कधीच मिळणार नाही. कारण भरतीच्या वेळी मोठ्या प्रमाणात पाणी येणार, तर ओहोटी आम्हांला बघायलाच मिळणार नाही. पाणी सुकल्यानंतरच हे मासे आम्हांला खायला मिळतात.

आता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास मी सांगू इच्छितो की करोना काळात जेव्हा सर्व कंपन्या बंद होत्या, त्यावेळी प्रदूषण होत नव्हते.

३८) **<u>श्री. कुंदन संखे, प्रकल्प बाधित मुरबे कुंभवली स्थानिक गावाचा पुत्रः-</u>**

आपण जनसुनावणी आयोजित केलेली आहे. याचा अर्थ जन आणि सुनावणी. जनसुनावणी म्हणजे जनतेचा विचार लक्षात घ्यावा असा आहे. जनसुनावणी म्हणजे जनतेच्या मनातील प्रस्तावित प्रकल्पाविषयीची भावना शासनास जनसुनावणी मार्फत पोहचविणे. हजारो संख्येने जनसमुदाय य़ेथे आलेला आहे. जनसुनावणीत सर्वांनीच प्रस्तावित प्रकल्पास विरोध

दर्शविलेला आहे. आम्हांला हा प्रकल्प नको आहे. २०१३ मध्ये नांव बदलून जिंदालने नांदगांव येथे प्रकल्प उभारणीचा घाट घातलेला होता, त्यावेळी तारापूर येथे हजारो संख्येने उपस्थित असलेल्या जनसमुदायाने येथून जिंदालला पळायला भाग पाडले होते.

आपणास शासन म्हणून एवढेच सांगेन की जिंदालने असा काही प्रयत्न केला, तर जिंदालला परत माघारी जावेच लागेल व येथील सर्व जनता जिंदालला माघारी पाठविल्याशिवाय स्वस्त बसणारच नाही.

येथे मला शासकीय प्रशासनाची व जिंदालची दाद द्यावीशी वाटते की एवढ्या तत्परतेने जिंदालने लोक एकत्र होण्या अगोदरच पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीसाठी प्रशासनाकडे अर्ज करुन पुढील कार्यवाही केली. जेव्हा वाढवण विस्तार हा लादण्यात आला, त्यावेळी लोकांनी खूप काळ संघर्ष केला.

एका बाजूला न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनच्या माध्यमातून देशाची सुरक्षितता यास सर्वोच्च प्राधान्य असताना, वाढवण बंदराचे भूमीपुजन केलेले असताना दुस-या बाजूस जिंदालला आणून त्या न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनची सुरक्षितता या दोघांच्या हातात दिली आहे काय? हा माझा पहिला औचित्याचा मुद्दा आहे की राष्ट्रीय सुरक्षिततेची कुठलीही तडजोड करता येणार नाही.

**<u>हरकतीचा पहिला मुद्दा –</u>**

राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनची सुरक्षितता लक्षात घेऊन तात्काळ शासनाने जिंदालच्या कुठल्याही प्रकारच्या बंदराला मान्यता न देता ते रद्द करावे हा माझा हरकतीचा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे.

जनसुनावणीच्या माध्यामातून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात ज्या काही त्रुटी असतील त्या बैठकीत मांडणे हे क्रमप्राप्तच आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावित प्रकल्पाविषयी स्थानिकांच्या भावनाही महत्वाच्या आहेत. कारण कुठलाही उद्योग हा त्या भौगोलिक भागाचा विकास करते किंवा विनाश करते.

**<u>हरकतीचा मुद्दा २ –</u>**

या पालघर जिल्ह्यात तारापुर औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून देशातील, आशियातील सर्वात मोठी वसाहत आहे. त्यातून स्थानिकांना काय मिळाले, तर स्थानिकांची

बेरोजगारी, परप्रांतीयांनी घेतलेले ठेके आणि प्रदूषण. तारापुर औद्योगिक वसाहतीत स्थानिकांना कुठलेच स्थान देण्यात आलेले नाही.

येथे जिंदाल उद्योगाची पार्श्वभूमी पाहिली, तर प्रस्तावित प्रकल्पात आमच्या गावातील किती लोकांना रोजगार देण्यात येईल याबाबत सांशकता आहे. जिंदालचा प्रकल्प ज्या महसूल क्षेत्रात उभा आहे, त्याचे नांव आहे कोलवडे. जिंदालने कोलवडे गावातील पाच तरी लोक त्याच्या कोलवडे प्रकल्पात कार्यरत आहेत काय हे दाखवावे. नांदगावची दाखवावी. म्हणजे ज्या उद्योगाने स्थानिकांना रोजगाराची हमीच दिलेली नाही, तो या बंदर उद्योगाच्या माध्यमातून आम्हांला देशोधडीला लावल्याशिवाय राहणार नाही.

मच्छी हे आमच्या जिल्ह्याचे अन्न आहे. त्यामुळे जिंदाल बंदर वाढवण बंदराच्या शेजारी जेव्हा उभे राहिल, तेव्हा आमच्या समुद्रातील मच्छी घेण्याची आम्हांला जिंदालकडून परवानगी घ्यावी लागेल. आमच्या मच्छिमार बांधवांच्या व्यवसायावर व त्यावर अवलंबून असणा-या आमच्या आदिवासी बांधवांच्या उपजिविकेवर (livelihood) कु-हाड फिरविणा-या जिंदालच्या बंदर प्रकल्पास आपण थांबवावे ही कळकळीची विनंती.

**<u>हरकतीचा तिसरा मुद्दा -</u>**

दळणवळणाचे वेगवेगळे मार्ग शोधत असतो. त्याचप्रमाणे समुद्रात मच्छिमार बोटींचा मार्ग निवडला जाईल, त्यावेळी कॉरिडॉर ठरविला जाईल, त्यामुळे त्यांच्या मच्छिमारीवर प्रचंड बंधने येतील. त्याचा फटका मच्छिमारांनाच बसणार आहे. तरी आपण या प्रकल्पास नाकारावे.

**<u>हरकतीचा चौथा मुद्दा -</u>**

मुरबेच्या माध्यमातून जमिनीवर कॉरिडॉर होत आहे. मुरब्यापासून एका बाजूला कुंभवली, दुस-या बाजूला खारेकुरण, तसेच इतर गावात वेगवेगळे कॉरिडॉर होत आहे. रेल्वे यार्ड व रस्त्याचा मार्ग होत आहे. कंपनीस समुद्राप्रमाणेच जमिनीवर सुध्दा राखीव क्षेत्र हवे आहे.

आता देशातील सर्वात संरक्षित घटक/वनस्पती असेल तर ती कांदळवन आहे. कांदळवनाच्या माध्यमातून शासनाने एक शासन निर्णय (जी.आर.) पारित केलेला आहे. गावातील सरपंच ही त्या कांदळवन संरक्षण समितीची अध्यक्ष आहे. तर ज्या गावात प्रकल्पास जमीन लागत आहे, त्या गावच्या सरपंच आणि ग्रामसभेला आपण विश्वासात घेतलेले आहे काय?

जर प्रकल्प प्रवर्तकांनी किंवा त्यांच्या सल्लागारांनी अभ्यास केलेला असला तर मुरब्यापासून जमिनीवर ६०% पेक्षा जास्त क्षेत्र कांदळवन आणि मीठागरे आहे.

तर शासनाने कांदळवन संरक्षणासाठी पारित केलेले विविध निर्देश डावलून प्रकल्प प्रवर्तकांना बंदर उभारणीस परवानगी देण्यात येणार आहे काय?

एक उदाहरण म्हणजे आता वनविभाग व कांदळवन विभाग असे वेगळा कक्ष (Cell) केलेला आहे. तर हजारो एकरांचे कांदळवन नष्ट करुन प्रकल्प उभारणीस परवानगी देणार का हा महत्वाचा मुद्दा आहे. कांदळवन हे संरक्षित क्षेत्र असल्याने आपण या प्रकल्पास नाकारावे.

आता पुढील महत्वाचा मुद्दा. पालघर जिल्हा हा आदिवासी बहुल असून पालघर जिल्हा पेसा (PESA) कायद्याअंतर्गत येतो, ज्यामध्ये जिल्ह्याच्या अनुसूचित क्षेत्रात स्वदेशी समुदायांना स्वराज्य अधिकार दिले जातात. येथील ग्रामपंचायतीस विशेष अधिकार दिलेले आहेत.

तर या प्रकल्पासाठी आपण ग्रामसभेची पूर्वपरवानगी घेतली आहे काय? प्रकल्प क्षेत्रातील बाधित गावातील ग्रामसभेचे ठराव हे घेतलेच पाहिजेत. भूमीपुत्रांच्या हितासाठी आपण निर्णय घेतलेच पाहिजेत.

३९) **श्री रुपेश करुणा किसन म्हात्रे, सदस्य, ग्रामपंचायत सातपाटी आणि उपाध्यक्ष, पालघर जिल्हा - महाराष्ट्र नवनिर्माण सेना**

अपूर्ण व कायदेशीरदृट्या अमान्य असलेल्या अहवालावर या प्रकल्पास मंजूरी देणे, म्हणजे पर्यावरणीय हक्कांचा थेट भंग आहे याची नोंद घेण्यात यावी.

तसेच मी जे पर्यावरणीय प्रश्न विचारणार आहे, त्याची नोंद घेण्यात यावी -

**प्रश्न क्रमांक १ -**
बंदर निर्मितीमुळे समुद्र किना-याचे नैसर्गिक स्वरुप कितीपत बदलणार?

**प्रश्न क्रमांक २ -**
प्रकल्पामुळे समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता, खारटपणा, प्रदूषण, रासायनीक पातळी किती व कशी प्रभावित होणार?

**प्रश्न क्रमांक ३ -**
किनारी भागातील वाळू, खनिजांची धूप रोखण्यासाठी कोणती उपाययोजना आहे?

**प्रश्न क्रमांक ४ –**

प्रकल्पामुळे समुद्र, जैव-वैविधतेवर माशांची संख्या, कोळंबी, शिंपले, कासव, प्रवाळ इत्यादी कितपत परिणाम होईल?

**प्रश्न क्रमांक ५ –**

समुद्रातील प्रवाळ पित्ती, सागर गवत पट्टी याचे संरक्षण कसे होणार?

**प्रश्न क्रमांक ६ –**

प्रदूषण नियंत्रणासाठी कोणते तंत्रज्ञान व सुविधा कार्यान्वित करण्यात येणार?

**प्रश्न क्रमांक ७ –**

हवामान बदल व समुद्रपातळी याची वाढ याचा प्रकल्पावर व स्थानिक भूमीपुत्रांवर काय परिणाम होईल?

**प्रश्न क्रमांक ८ –**

प्रकल्पासाठी आवश्यक झाडतोड किती आहे व त्याची पर्यायी लागवड कुठे व किती आहे?

**प्रश्न क्रमांक ९ –**

किनारी मँग्रोस/कांदळवन व दलदल क्षेत्र किती प्रमाणात नष्ट होणार आहे?

**प्रश्न क्रमांक १० –**

घरगुती सांडपाणी व औद्योगिक रसायने समुद्रात न सोडण्याची खात्री कशी दिली जाणार आहे?

**प्रश्न क्रमांक ११ –**

समाज व स्थानिक लोकांवर काही परिणाम होणार आहेत? प्रकल्पामुळे किती कुटुंबांचे पुनर्वसन होणार आहे?

**प्रश्न क्रमांक १२ –**

स्थानिक गावांतील भूखंड, शेतजमिन, घरे किती प्रमाणात अधिग्रहित करण्यात येणार आहेत?

**प्रश्न क्रमांक १३ –**

स्थानिकांना कोणत्या प्रकारचा रोजगार दिला जाणार आहे? रोजगार फक्त कुशल व्यक्तींनाच देणार की अकुशल व्यक्तींना संधी देण्यात येणार आहे?

**प्रश्न क्रमांक १४ –**

प्रकल्पासाठी बाहेरुन किती प्रमाणात लोक/कामगार आणणार आहात?

तांत्रिक व दीर्घकालीन प्रश्न आहेत, कृपया याची नोंद घेण्याता यावी -

१) ईआयए मध्ये १५-२० वर्षांनंतर होणा-या दीर्घकालीन परिणामांचा अभ्यास केला गेला आहे का?

२) समुद्रातील नैसर्गिक चक्रीवादळे, वादळे, त्सुनामी यांचा धोका अभ्यासला गेला आहे का?

३) बंदर अपघात झाल्यास स्थानिक बचाव योजना काय आहे? स्वतंत्र तज्ज्ञांकडून पूर्वालोकन झाले आहे काय?

४) जर पर्यावरणीय अनुमती नाकारली गेली, तर पर्यायी योजना आहे का?

या सर्व प्रश्नांची नोंद घेण्यात यावी व उत्तरे लेखी स्वरुपात देण्यात यावीत.

**४०) श्री. केतन रविंद्र राऊत, राहणार मुरबे, तालुका, जिल्हा पालघरः-**

मी शरीराने आणि मनाने सुध्दा मच्छिमारच आहे. बैठकीत उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेतलेली आहे, तर त्याचा अहवाल आम्हांला उपलब्ध करण्यात यावा.

मा. जिल्हाधिकारी महोदया, प्रकल्प प्रवर्तक सांगतात की प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ६०० लोकांना रोजगाराची संधि प्राप्त होणार आहे.

करोनाचे संकट आलेले असताना माझ्या खाडीने लाखो लोकांना रोजगार दिलेला होता. या मुद्द्याची नोंद घेण्यात यावी. तसेच ही बेकायदेशीर जनसुनावणी चालू आहे. ती रद्द करण्यात यावी.

**४१) श्री. प्रशांत यशवंत तरे, सदस्य, ग्रामपंचायत मुरबे, तालुका, जिल्हा पालघरः-**

आपल्या गावात जेथे जिंदाल पोर्ट होत आहे, तेथे तिवरांची झाडे आहेत. तिवरांचे झाडे कापले, तर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होतो. जिंदाल पोर्ट उभारताना त्यांना लाखो झाडे कापावी लागतील. तर त्यांना सजा कुठली देण्यात येणार? ते आम्हांला कळविण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी यांनी फक्त प्रस्तावित प्रकल्पबाबत मुद्दे उपस्थित करण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

४२) **<u>श्री. अतुल राणे, राहणार-नांदगाव, तालुका, जिल्हा-पालघरः-</u>**

माझ्या हरकती अशा आहेत की -

<u>मुददा क्रं. १ -</u>

सकाळी बैठक सुरु होण्यापूर्वी नोंदणी करण्यात आली. त्यावेळी काही कर्मचारी होते, ते ओळखपत्र शिवाय होते. तरी हे लोक कोणाचे होते, शासनाचे होते की जिंदालचे होते? मी त्यावेळी हस्तक्षेप केला. पोलिसांनी त्या माणसांना बाजूला केले. आम्हांला काही मुद्द्यांची उत्तरे आताच हवी आहेत.

जे लोक काम करत होते, ते शासनाची होती की जिंदालची होती.

<u>मुददा क्र. २ -</u>

ज्यावेळी आमचे बंधू तेथे येत होते, त्यावेळी त्यांनी कागदे फाडली. नोंदणी फाडली. तर संबंधित व्यक्तीवर जिल्हाधिकारी मॅडम व पोलिस अधिक्षक काय कारवाई करणार?

श्री. अतुल राणे यांनी सांगितले की २०१२ ला अशीच जनसुनावणी झालेली होती. याच जिंदालने आमच्यापैकी काही लोकांची नांवे घेऊन आमची ना हरकत असल्याचे कोर्टात दिलेले होते. तिकडे त्या नोंदवहीत आमची स्वाक्षरी आणि मोबाईल नंबर हे कशासाठी घेण्यात आलेले होते? ती सही घेऊन ए.आय. वापर करुन जिंदाल ती ना हरकत म्हणून वापर करुन कोर्टात देणार आहेत काय?

त्यांनी आवाहन केले की माझ्या सर्व बांधवांना विनंती आहे की फेसबुक, इन्स्टाग्रॅमला लाईव्ह जा, हे सर्व रेकॉर्ड करा, कारण तुमच्याच नावाने हा जिंदाल कोर्टात ना हरकत दाखला देईल.

<u>मुददा क्रं. ३ -</u>

मा. जिल्हादंडाधिकारी मॅडम, आपण या बैठकीच्या न्यायाधिश आहात. जें स्थानिक आहेत ते व जिंदाल हे दोन्ही पक्ष आपल्या समोर हवेत. जिंदालची लोक हे स्टेजवर कसे काय? त्यांना प्रथम खाली उतरवा. बैठकीत अनेकांनी सांगितले की जनसुनावणी चुकीची होत आहे. तरी जिंदालची माणसे ही आपल्या समोरच असली पाहिजेत. समोर जे तीन व्यक्ती काम करत आहेत, ते शासनाचे आहेत की जिंदालचे. जर शासनाचे असतील तर त्यांच्याकडे ओळखपत्र का नाही.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की आपण प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीबाबत मुद्दे उपस्थित करण्यात यावेत. येथील प्रक्रियात्मक स्पष्टता (procedural clarity) म्हणुन सांगण्यात येते की जे बैठकीचे इतिवृत्त लिहून घेत आहेत, ते महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आहेत. नंतर एम.एम.बी.चे अधिकारी आहेत. यांचा प्रकल्प हा पी.पी.पी. तत्वावर आहे. सर्व गोष्टींची नोंद घेण्यात येत आहे. व्हिडिओ रेकॉर्डिंगसुध्दा चालू आहे.

त्यावेळी श्री अतुल राणे यांनी संबंधितांची ओळख सांगण्याची सूचना केली. त्यावेळी अध्यक्षा यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. तसेच मंडपाच्या बाहेर जो प्रसंग झाला, त्याची पोलिस विभागाने दखल घेतलेली आहे.

श्री अतुल राणे यांनी आक्षेप नोंदविला की २०१२ ची जी जनसुनावणी झाली, त्याला आम्ही सर्वांनी आक्षेप नोंदविलेला होता. विराजने नवापुर बंदर बांधण्याचा घाट घातलेला होता. ते रद्द करुन जिंदालने आधी नांदगाव आणि आता येथे मुरबेत बंदर बांधत आहे. तो अहवाल आपण या जनसुनावणी अहवालासोबत बरोबर जोडणार आहात का?

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत वारंवार सांगण्यात आले की बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करुन आपण नोंदविलेले लेखी आक्षेप व व्हिडिओ रेकॉर्डिंग हे एनेक्चर म्हणून (सोबत म्हणून) पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल. तसेच बैठकीचे इतिवृत्त हे उपस्थितांना सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री राणे यांनी आक्षेप नोंदविला की आपण ज्या मोकळेपणाने उत्तर देत आहात, त्याप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ उत्तर देत नाही.

श्री अतुल राणे यांनी आक्षेप नोंदविला की आमचा आवाज जिंदालने २०१२ ला दाबण्याचा प्रयत्न केलेला होता. तो आम्ही दाबून दिला नाही. कॅगचा २०१० चा अहवाल होता की जिंदालने ५६,७५१/- चा भ्रष्टाचार केलेला होता. तसेच १९९०-९५ या वेळेस जिंदालच्या स्क्रॅप यार्डमध्ये स्फोट झालेले होते. पोलिस दफ्तरी याची नोंद आहे.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणीय सूचना/आक्षेप हेच नोंदविण्यात यावेत.

VA

--

श्री अतुल राणे यांनी मत मांडले की भारताच्या राज्य घटनेने ग्रामसभेला सर्वाधिकार दिलेले असून सर्व ग्रामसभेने प्रकल्पास विरोध केलेला असून आपण सर्व ग्रामसभेचे ठराव आपण या अहवालासोबत शासनास सादर करण्यात येणार आहेत काय? अध्यक्षा यांनी सूचनेची नोंद घेतल्याचे सांगितले.

४३) **<u>श्री. रामकृष्ण जगन्नाथ तांडेल, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीः-</u>**

येथे जी जनसुनावणी चालू आहे, तर येथे आमचा जीवन-मरणाचा प्रश्न आहे. येथे एका ग्रामस्थाने आरोप केला की बैठकीत काही अधिकारी हे झोपत आहेत. तर काही अधिकारी हे मोबाईलवर बोलत आहेत. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी आपली ओळख सांगावी.

त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीतच ओळख सांगितलेली आहे. तरी उपस्थितांना आपल्या सूचना, आक्षेप नोंदवाव्यात.

श्री तांडेल यांनी आक्षेप नोंदविला की बैठकीत सर्व उपस्थितांनी ईआयए अहवाल अपूर्ण आहे याबाबत हरकत नोंदविलेली आहे. त्यामुळे ही जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे अशी सर्वांनीच हरकत नोंदविलेली आहे. तरीही ही जनसुनावणी रद्द करण्याची मागणी होऊनही ही जनसुनावणी चालू आहे.

श्री तांडेल यांनी पुढे विचारणा केली की हा जो शिपिंग कॉरिडॉर हा किती नॉटिकल माईल्सवर आहे?

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीस सांगण्यात आलेले आहे की जनसुनावणी ही फक्त एखादी नैसर्गिक आपत्ती किंवा आपतीजनक परिस्थिती उद्भवल्यास रद्द करुन पुढील तारखेस घेता येते. दुसरी गोष्ट आपण केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. उपस्थितांनी कृपया विषयांवरच बोलावे.

श्री तांडेल यांनी जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे व ती रद्द करा अशी मागणी केली. अध्यक्षा यांनी नोंद घेतल्याचे सांगितले.

४४) **<u>श्री. शंकर तारले, राहणार-केळवा माहिम, तालुका, जिल्हा पालघरः-</u>**

पालघर जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा आहे. सागरी, नागरी आणि डोंगरी अशा या तीन्ही विभागात हा जिल्हा आहे. जेएसड्ब्लु पोर्टसाठी ही जनसुनावणी कार्यान्वित आहे. याअगोदर अनेक विनाशकारी प्रकल्प या जिल्हयात आणले आहेत. आता पालघरच्या पश्चिम भागात वाढवणबरोबरच हा प्रकल्प आणण्याचा घाट घातला गेलेला आहे. शिवाय नागरी विभागात टेक्सटाईल पार्कचे नियोजन आहे. पालघर जिल्ह्यातील जनता या प्रकल्पाच्याविरुध्दच लढत राहणार आहे का?

बोईसर भागातील कारखाने, पालघर विभागातील कारखाने, येथील दुषित पाण्यामुळे अनेक घरे उध्वस्त झालेली आहेत. प्रदूषणामुळे येथील नारळाच्या उत्पादनावर, पाणवेलीवर परिणाम झालेला आहे. या प्रकल्पामुळे मच्छिमार समाज, आगरी समाज यांच्यावर परिणाम झालेला आहे. मागन्यासाथी पालघर जिल्ह्यातील सर्व समाज घटक या प्रदूषणामुळे बाधित झालेले आहेत. वाढवण बंदर, मुरबे बंदर हे पर्यावरणाचा -हास करणारे प्रकल्प असून त्यास आपण मंजूरी देऊ नये.

येथे सत्याची बाजू मांडण्यासाठी हा भूमीपुत्र उतरलेला आहे. तरी यांना न्याय मिळून दिला पाहिजे.

४५) **<u>सौ. अंजली अरविंद बारी, सरपंच, नवापूर ग्रामपंचायत, जिल्हा-पालघरः-</u>**

गोल्डन बेल्ट म्हणून ओळखले जाणारे अनेक माशांचे प्रजजन क्षेत्र असलेले सातपाटी आणि मुरबे, सिल्व्हर पापलेटसाठी प्रसिध्द असणारी खाडी. याठिकाणी काही औद्योगिक छेडछाड झाल्यास सागरी संपत्तीची नाश होईल.

प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होत असते. त्यामध्ये सल्फर ऑक्साईड व विविध प्रदूषके आढळतात, जे आम्ल पावसाला कारणीभूत ठरतात. या प्रदूषकांच्या संपर्कात आल्याने खोकला, श्वसनाचे आजार, हृदयविकार इ. गंभीर आजार होऊ शकतात. ही प्रदूषके सार्वजनिक आरोग्यावरही परिणाम करतात, ज्यात श्वसनाचा आजार, कर्करोगाचा धोका वाढतो. त्यामुळे आमचा स्थानिकांचा या प्रकल्पास विरोध आहे.

जहाजे व उपकरणे विशेषतः डिझेल वापरणारी यंत्रणा विविध प्रदूषके उत्सर्जित करतात, म्हणून या प्रकल्पास आमचा विरोध आहे.

बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व नागरिकांना आवाहन करते की येथे हजारो लोक प्रकल्पास विरोध करण्यास आलेले आहेत. तरी सर्वांना बोलण्याची संधि देण्यात यावी.

कोणालाही कमी लेखू नका. आपला लढा जिंकणे हे महत्वाचे आहे. विरोधाचे मुद्दे मांडून सादर करण्यात यावेत.

४६) **<u>तृप्ती कुंदन संखे, सरपंच, कुंभवली एकलारे ग्रामपंचायत, जिल्हा पालघरः-</u>**

मुरबे गावात जिंदाल बंदर प्रस्तावित आहे. मुरबे गावाला लागूनच कुंभवली एकलारे गावे आहेत. प्रकल्पासाठी दळणवळणासाठीचे कॉरिडॉर आमच्या गावातूनच जाणार आहेत. शासनाने पुढाकार घेऊन ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामस्थांच्या प्रश्नांचे निराकरण करणे गरजेचे होते. ही माझी हरकत आहे.

ग्रामसभेचा ठराव प्राप्त करणे बंधनकारक असताना तो घेण्यात आलेला नाही, शासनाने फक्त बैठकीचे एक पत्र पाठविलेले आहे.

ही पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी ही ईआयए अहवालानुसार आयोजित करण्यात आलेली आहे. म्हणजे एकप्रकारे आमच्या ग्रामपंचायतीवर ती लादण्यात आलेली आहे. ही दुसरी हरकत आहे.

आमच्या गावाच्या ज्या महसूल क्षेत्रातून प्रकल्पाचा हा कॉरिडॉर जाणार आहे, त्यासाठी आमच्या गावातील किती क्षेत्र लागेल यांची काही माहिती अहवालात नाही, आमच्या ग्रामपंचायतीस त्याबाबत अवगत करण्यात आलेले नाही. ही तिसरी हरकत आहे.

आज जिल्हाधिकारी महोदया यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केलेली आहे. आपण झाडे लावा, झाडे जगवा म्हणून घोषणा देतो. पण पर्यावरण संरक्षणासाठी असलेले संवेदनशील असलेले कादंळवन मोठ्या प्रमाणात आमच्या कुंभवली गावातील महसुली क्षेत्रात आहे. कुंभवली महसुली गावात दूत खाडी म्हणून नदी असून खाडीच्या स्वरुपात ती समुद्राला जाऊन मिळते. ज्यावेळी समुद्राची भरती ओहोटी असते, तेव्हा दूतखाडी नदीची पातळी वाढते, तर शेतात पाणी जाऊ नये म्हणून कांदळवन त्याचे संरक्षण करते. म्हणजे दुस-या भाषेत सांगावयाचे म्हणजे कांदळवन हे नैसर्गिकरित्या होऊन देत नाही. या बंदरामुळे जेव्हा समुद्राचा प्रवाह विभागला जाईल व तो खाडीच्या दिशेने सरकेल, त्यावेळेस दूतनदी खाडीची पाण्याची पातळी ही वाढली जाणार आहे.

त्यामुळे कांदळवन नष्ट होऊन ते समुद्राचे पाणी आमच्या शेतात येईल. अशा प्रकारे नुकसान हे तारापुर बंदरामुळे झालेलेच आहे. आमची उरलीसुरली शेतीसुध्दा हे जिंदाल बंदर बांधल्यास नष्ट होणार आहे. याची आपण नोंद घ्यावी.

जेव्हा झाडे तोडतात, तेव्हा वनविभागाची परवानगी ही घ्यावी लागते. तर कांदळवनाबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी पूर्वपरवानगी घेतलेली आहे काय? कांदळवनाचा अभ्यास केलेला आहे काय? ईआयए अहवालात त्याचा उल्लेख नाही.

आमच्या गावातून प्रस्तावित प्रकल्पासाठी जो कॉरीडॉर जाणार आहे, त्यामुळे आमच्या गावातील कांदळवन हे बाधित होणार आहेत. तर कांदळवन बाधित क्षेत्राची माहिती, ती तोडण्यासाठी सक्षम-प्राधिकरणाची पूर्वमान्यता व त्याबाबत शासनास भरावा लागणारा दंड याबाबत काहीही माहिती अहवालात नाही.

आता बैठकीत सर्वांनी उपस्थित केलेला मुद्दा म्हणजे रोजगाराचा प्रश्न. आमच्याकडे तारापूर औद्योगिक वसाहत आली. लोकांना रोजगार मिळाला. जिंदालचा एक प्रकल्प हा तारापूरमध्ये कोलवडे गावात आहे. पूर्वी कोलवडे- कुंभवली गावात एकच ग्रामपंचायत होती. मात्र त्या जिंदाल प्रकल्पात बाधित, प्रकल्पग्रस्तांनाही रोजगार देण्यात आलेला नाही, तसेच स्थानिकांनाही रोजगाराची संधि देण्यात आलेली नाही. त्यांना बाधित व स्थानिक लोकांना नोक-या दिलेल्या नाहित.

तरी येथे उपस्थित करण्यात आलेल्या जनभावनांचा आपण विचार करावा.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

४७) <u>श्री विनित प्रतिभा प्रभाकर पाटील, राहणार-वरोर, तालुका, जिल्हा पालघरः-</u>

आम्ही संविधान मानणारे, कायदा मानणारे भाबडी जनता आहे. वाढवण बंदराच्या वेळी असेच झाले, मात्र मिडियामध्ये आले की वाढवण बंदरास ५०,००० लोकांचा पाठिंबा होता. तेवढी लोक सुध्दा जनसुनावणीस आलेली नव्हती. आम्ही येथे आलेलो आहोत, ती जनसुनावणी रद्द करण्यासाठी आलेलो आहोत. जिल्हाधिकारी महोदया, आपण प्रथम जनतेचा विचार केला पाहिजे. आम्ही पर्यावरणवादी आहोत. आम्हांला माहित आहे की समुद्रात प्रकल्पासाठी भराव टाकणार, ते पाणी आजूबाजूच्या खेड्यात जाणारच आहे. तर आपण जिल्ह्याचे पालक असून ही जनसुनावणी का जबरदस्तीने केली जात आहे.

तरी ही जनसुनावणी त्वरित रद्द करण्यात यावी. प्रशासन हे एवढे हतबल का आहे? आम्ही कोणीही बोलणार नाही. आपण रद्द केल्याशिवाय आम्ही येथून उठणारच नाही.

--

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण केलेल्या सूचना/हरकतींची नोंद घेण्यात आलेली आहे. आता पुढील वक्त्यास बोलून द्यावे.

४८) **<u>श्री. सुनील रमेश आचरेकर, राहणार-मुरबे गाव, तालुका, जिल्हा-पालघरः-</u>**

येथील स्थानिकांनी ज्या प्रखरतेने विरोध केला, यावरुन आपल्या लक्षात आले असेल की लोकांचा रोष कशासाठी आहे. सादर केलेला ईआयए अहवाल आणि सादरीकरण हे खोटे आहे. पालघर जिल्हयात जे उत्पनाचे साधन आहे, त्यात मुख्य साधन आहे मासेमारी. वन डिस्ट्रिक्ट, वन प्रोडक्ट या थीमखाली पालघर जिल्हयात मासेमारी व चिक्कू ही दोन उत्पादने येतात. महाराष्ट्राचा राजमासा म्हणून सिल्व्हर पापलेट याची निर्यात होत असते. जगामध्ये सर्वाच जास्त उत्पत्ती ही सातपाटीमध्ये आमच्या गावात होते, तर जगामध्ये मच्छिचे भाव हे सातपाटी गावातील लोकच ठरवितात. सातपाटी मुरब्याच्या शेजारी असतानाही सातपाटी गावाचा उल्लेखही ईआयएमध्ये केलेला नाही. याचा विचार प्रकल्पाचे नियोजन करताना करण्यात आलेला नाही. शिंपल्या व वाढ्या मधील वाढ्या हा आमच्या मुरबा सातपाटी खाडीतच मिळतो. ज्याला आपण लॉबस्टर म्हणतो, तो कशावर जगतो, तर त्याच्यासाठी लागणारे जे शेवाळे आहे, ते येथील किनारपट्टीवरच तयार होते आणि ही जात नामशेष होऊ शकते. तसेच घोळ, धाडा हे मच्छिमारांचे उत्पादन वाढविणारे आहेत. विनाशकारी बंदर आणून येथील मच्छिमारी उध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहेत.

प्रस्तावित प्रकल्पात फक्त ६०० लोकांना रोजगार देणार आहेत, पण मच्छिमार व त्यावर अवलंबून असणारे सहा लाख लोकांना तुम्ही उध्वस्त करणार आहात. तरी येथील मच्छिमार बांधवांच्या विरोधाची नोंद घ्यावी ही विनंती.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण केलेल्या सूचना/हरकतींची नोंद घेण्यात आलेली आहे.

४९) **<u>श्री जयवंत तांडेल, अध्यक्ष, ठाणे जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार संघः-</u>**

या जनसुनावणीच्या माध्यमातून आपणास सूचित करायचे आहे की झाई ते उत्तन पर्यंत येथील सर्व मच्छिमार गावे या जनसुनावणीत सहभागी आहेत. प्रस्तावित प्रकल्पामुळे आमचे येथील मच्छिमार बांधव हे नेस्तनाबूत होणार आहेत. सर्व किनारपट्टी मच्छिमार संघानी (झाई ते उत्तन पर्यंत) मला निरोप दिलेला आहे की त्यांचा या प्रकल्पास विरोध आहे.

तरी सर्व मच्छिमार संघाचा या जिंदाल बंदरास विरोध आहे. तरी आमचा विरोध हा शासनास कळवावा.

५०) **श्री मोहन देवराव राणे, राहणार-नांदगाव नागरिक, तालुका, जिल्हा-पालघरः-**

दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१२ रोजी आज तेरा वर्षे पूर्ण झाली. जिंदालने त्यावेळी नांदगांव बंदराची जनसुनावणी बोईसर येथे घेतलेली होती. पुणे आणि दिल्ली येथे आमच्या गावातील काही नागरिक गेले. मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, दिल्ली येथे स्थानिक ग्रामस्थांनी जे मुद्दे मांडले, ते सर्वोच्च न्यायालयात टिकून नयेत म्हणून जिंदाल स्वतः ऑगस्ट, २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयात जाऊन शपथपत्र दिले की आम्ही नांदगांव बंदर प्रकल्प रतबादल करत आहोत. महाराष्ट्रात ७२० कि.मी. सागरी किनारा आहे. गुजरातला १२०० कि.मी. सागरी किनारा आहे.

महोदया, नांदगाव समुद्री हद्दीला लागून बंदर मुरब्याला नेले आणि नांदगाव समुद्री हद्दीत जी आमची सप्तकुळी माता आहे, तेथपर्यंत अतिक्रमण केलेले आहे. हा contempt of court आहे.

श्री मोहन राणे यांनी आक्षेप नोंदविला की भराव टाकल्यामुळे आमच्या शेतीची भौगोलिक रचनाच बदलेल. भराव टाकल्याने समुद्राचे पाणी हे शेतीमध्ये येईल आणि आमची शेती नष्ट होईल. गोड्या पाण्याचे झरे नष्ट होतील. बोटींच्या येण्या-जाण्याने व कच-यामुळे आमचा गोल्डन बेल्ट असलेला सामुद्रीक भाग प्रदूषित होऊन माशांची प्रजनन स्थाने ही पूर्णपणे नष्ट होतील. त्यामुळे तालुक्यातील ८०% मच्छिमार समाज उध्वस्त होईल व त्याचबरोबर त्यांच्यावर अवलंबून असणारा आदिवासी समाज हा देशोधडीला लागेल. ताडीमाडी करणारा भंडारी समाजाचा व्यवसाय बुडेल. तसेच ४०% आदिवासी बांधव हे चार महिन्यांसाठी शेतीकामासाठी येथे स्थलांतर करत असतात. शेती नापीक झाल्याने त्यांचेही येथे नुकसान होणार आहे. प्रकल्पामुळे कांदळवनाचा -हास होईल. समुद्रात भराव टाकल्याने येथील जैव-विविधता नष्ट होईल.

मा. जिल्हाधिकारी महोदया, आपण पालघर जिल्ह्याच्या संरक्षक (custodian) आहात. येथील जनतेची सुरक्षा राखणे ही जिल्हा प्रशासनाची जबाबदारी आहे. जिंदाल ते करणार नाही.

सादरीकरणात दर्शविण्यात आले की पन्नास कोटी रुपये स्थानिक विकासासाठी देऊ. आम्हांला त्यांच्याकडून नको.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचनांची नोंद घेतल्याचे सांगितले.

..//

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की जे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत, ते परत सांगू नये. नविन मुद्दे असल्यास ते उपस्थित करण्यात यावे. तसेच बैठकीत सुमारे ३,००० (तीन हजार) लेखी सूचना, हरकती प्राप्त झालेल्या आहेत. ज्यांना कोणाला लेखी सूचना, हरकती नोंदवाच्या असतील, ते पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीकडे सादर करु शकता. त्याची पोच देण्यात येईल.

५१) **मंजुषा गायकवाड, शिवसेना हिंद केसरी सेना श्रमिक सचिव,**

शिवसेना हिंद केसरी सेना श्रमिक सचिव, अधिकृत प्रतिनिधी म्हणून मी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे आणि दिल्ली आणि मा. सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया यात मी याचिकाकर्ती आणि पक्षकार होते. आमचे पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे साहेब व मा. दीपक राऊत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही उपस्थित केलेल्या तांत्रिक मुद्द्यावर जिंदालला प्रस्तावित नांदगाव बंदर रद्द करण्यास भाग पाडले.

आमचे पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे साहेब व मा. दीपक राऊत साहेब यांची प्रतिनिधी म्हणून मी आश्वासन देते की तांत्रिक व संसदीय लढाई करुन आम्ही मुरबे बंदर रद्द करणार म्हणजे करणारच. ही जर केंद्र सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट आहे तर आम्ही त्यांचे चिराग नाही की आम्ही त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करु. प्रस्तावित जिंदाल मुरबे बंदरास आमचा विरोध आहे, विरोध आहे आणि विरोधच आहे.

५२) **श्री मुकेश मेहेर, मच्छिमार आणि माजी पंचायत सद्स्य, सातपाटी, तालुका, जिल्हा पालघरः-**

मुरबे बंदराचे स्थान सातपाटीच्या उत्तरेला आहे. सातपाटी हे ५०० मीटरवर हद्द लागून आहे. सातपाटीची ओळख ही सहकार, स्वातंत्र्य लढा आणि मासेमारी अशी आहे. मुंबई गॅझेटच्या १९२० मध्ये सातपाटी हे मासेमारी बंदर म्हणून घोषित केलेले आहे.

या प्रस्तावित मुरबे बंदरामुळे समुद्रात मासेमारी करणारे मोठ्या प्रमाणात मच्छिमार बाधित होणार आहे. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी CWPRS, मत्स्य विभाग, महाराष्ट्र शासन, Central Water Commission यांचे अहवाल नाहीत. तर प्रश्न कोणत्या मुद्द्यावर उपस्थित करायचे.

आज हवामान बदल व तापमान वाढीचा सर्वात मोठा फटका बसतो तो किनारपट्टीवरिल लोकांना. सातपाटी हे भारतातील सर्वात वेगाने धूप होणारे गाव आहे. त्यामुळे केंद्र सरकारची

CWPRS ही संस्था सातपाटी किनारा व समुद्रातील अंतर्गत घडामोडी अभ्यास प्रकल्प गेले चार वर्षे राबवित आहे. त्याचा अभ्यास झालेला आहे आणि पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीत तो अहवाल जाणूनबूजून लावला नाही का अशी शंका येते.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी त्यांच्या आपत्कालीन परिस्थितीचा विचार करुन एक विशेष बाब म्हणून सातपाटी गावाचे धूप प्रतिबंध बंधा-यास मान्यता दिलेली आहे.

आमच्या मत्स्य व्यवसायात ८०% महिलांचा समावेश असतो. त्यांच्या रोजगारावर गदा येणार आहे.

श्री मुकेश मेहेर यांनी आक्षेप नोंदविला की तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी CWPRS, मत्स्य विभाग, महाराष्ट्र शासन, Central Water Commission यांचे अहवाल नाहीत. तर प्रश्न कोणत्या मुद्द्यावर उपस्थित करायचे.

त्यावेळी प्रतिनिधी, अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी सांगितले की आपल्या प्रश्नांची नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री मेहेर यांनी सांगितले की मच्छिमार क्षेत्र हे मोठ्या प्रमाणात बाधित होत आहे. आक्षेप नोंदविला की तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी CWPRS, मत्स्य विभाग, महाराष्ट्र शासन, Central Water Commission यांचे अहवाल नाहीत. तर ते अहवाल प्राप्त करुन घ्यावेत व ही जनसुनावणी पुन्हा आयोजित करण्यात यावी.

५३) <u>**श्री हर्षल लोखंडे, भूमीपुत्र सेनेचा-**</u>

आज पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी येथे आयोजित करण्यात आलेली आहे, आणि आम्ही सर्व किनारपट्टीत राहणारे सर्वजण येथे आलेलो आहोत. आमच्या पालघर जिल्ह्यात आपण सगळे प्रकल्प आणून ते स्थानिकांच्या माथ्यावर टाकत आहेत.

आपण जनसुनावणी आयोजित करता आणि आमचे म्हणणे सुध्दा ऐकून घेत नाहीत. फक्त सूचना, हरकती नोंदवून घेतात.

माझे म्हणणे आहे की पालघर जिल्ह्यात बरेच प्रकल्प आणले आणि येथील स्थानिक लोकांवर दादागिरी करत आहेत.

पालघर जिल्ह्यात या प्रस्तावित प्रकल्पामुळे संतापाची लाट आहे. आपण मुरबा जेटी आणून दाखवा. तुम्ही मुरबा जेटी आणली, की येथे तीव्र आंदोलन करुन जेटी चालू होऊन देणार नाही.

५४) **श्री विजय वझे, समाज मित्र मानवता संघटन-**

आज सकाळपासून सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पुढारी यांनी मुद्दे मांडले आहेत. आपल्या जनहिताचे मुद्देसुध्दा मांडले. असेच मुद्दे वाढवण बंदराच्या वेळी सुध्दा मांडलेले होते. तेथे सुध्दा जवळजवळ सर्वांनीच प्रकल्पास विरोध दर्शविला, मात्र मिडियामध्ये बातमी आली की पन्नास हजार समर्थकांनी प्रकल्पास पाठिंबा दिला. तेथे आमची फसवणूक करण्यात आली. तशीच या जनसुनावणीत होणार असे आम्ही गृहित धरलेले आहे. येथे सर्व उपस्थितांनी प्रकल्पविरोधी मत मांडलेले आहे.

मात्र आता हा जिंदाल मुरबे प्रकल्प लादला, तर रक्ताचा एक थेंब राही पर्यंत आम्ही लढू. तसेच कायदेशीर सुध्दा लढू. जरी जिल्हाधिकारी, पालघर बेकायदेशीर जनसुनावणी आयोजित करत असतील, तर आम्ही कायदेशीरपणे हा प्रकल्प होऊच देणार नाही.

५५) **श्री लोचन चंद्रकांत चौधरी, तारापूर अणूउर्जा प्रकल्पग्रस्तः-**

मी तारापूर प्रकल्पग्रस्त आहे. आमचा प्रकल्प हा केंद्र सरकारचा होता. तरीही आमच्यावर अन्याय झाला. जिंदाल मुरबे हा खाजगी प्रकल्प आहे. खाजगी कंपनी प्रकल्पग्रस्तांना काहीही देणार नाही. प्रकल्पग्रस्ताचे दुखणे काय असते हे आम्ही अनुभवलेले आहे.

मी येथे एकच सांगतो की एका बाजूला वाढवण बंदर, दुस-या बाजूला मुरबे बंदर, मध्ये तारापूर अणूउर्जा प्रकल्प, तर काही अपघात झाल्यास आमची स्थिती रशियाच्या चर्नोबिलपेक्षा खराब होईल. चर्नोबिलने ८०० कि.मी.क्षेत्र बाधित झालेले होते. तरी मी विनंती करतो की जनसुनावणी घेताना सारासार विचार करण्यात यावा. माझी विनंती आहे की येथील सर्व विनाशकारी प्रकल्प हे रद्द झालेच पाहिजे.

५६) **सौ. सुफल नीतीन तरे, राहणार-सातपाटी, तालुका, जिल्हा-पालघरः-**

आमच्या मच्छिमा-यांचा संसार, आमची घरे आणि आमची उपजिविका असणारी मच्छिमारी आणि आमचा रोजगार या जिंदाल प्रकल्पासाठी उध्वस्त करण्याचा जो कट घातलेले आहे, त्यास आम्ही शेवटपर्यंत विरोध करु. समुद्र आमच्या कोळी बांधवांचा आहे, जिंदालचा नाही.

५७) **स्थानिक ग्रामस्थ नागरीक, ता. जि. पालघर**

मा. जिल्हाधिकारी महोदया, येथे जे सर्व भूमीपुत्र एकत्र आपल्या गावासाठी आणि आपल्या हक्कासाठी आलेले आहेत. जिंदाल ही खाजगी कंपनी येथे आणण्याचा प्रयत्न करुन आपण येथील सर्व भूमीपुत्रांना त्रास देत आहेत. येथील कुठलाही भूमीपुत्र हे सहन करणार नाही. वेळ आली तर आम्ही आमचे रक्त सांडवू, पण हा प्रकल्प होऊ देणार नाही. आम्ही सर्व कोळी बांधव रस्त्यावर उतरु व रेल्वे ट्रॅकवर उतरुन दिल्लीपर्यंत आमच्या हक्कासाठी शेवटपर्यंत लढा देऊ.

५८) **<u>श्री उत्तम पिंपळे, राहणार-</u>**

जनसुनावणीत जे जे मुद्दे उपस्थित करावयाचे होते, ते ते सर्व वक्त्यांनी कथन केलेले आहेत. मी १९८० च्या दशकापासून या परिसरात राहतो व सामाजिक कार्यातून जिंदाल ग्रुपला पाहिलेले आहे. जनसुनावणी पूर्वी जिल्हा प्रशासनाने स्वतः सर्वेक्षण केले असते, तर या अहवालातील त्रुटी समजल्या असत्या आणि याआधी ही पिरामल कंपनी होती. जिंदालने ती घेतली. त्यावेळी, लक्षात असेल तर, या पिरामल कंपनीने प्रकल्प सुरु केल्यानंतर एकाही स्थानिकांना, प्रकल्पग्रस्तांना रोजगार दिलेला नाही. कंपनीतील जे कामगार युनियनमध्ये गेले, त्यांना जिंदाल कंपनीने पोलिस बळाचा वापर करुन अक्षरशः हाकलून लावलेले आहे. तरी तेव्हापासून आतापर्यंत किती मराठी युवक-युवती प्रकल्पात आहेत याचा अभ्यास करण्यात यावा.

हा पालघर जिल्हा २०१४ मध्ये पेसा जिल्हा झाला - कारण पालघर हा आदिवासी बहुल जिल्हा आहे. जर पालघर जिल्हा पेसा जिल्हा झाला, तर जिंदाल पालघरमध्ये १९८० पासून आहे. मात्र यांनी स्थानिक विकासासाठी काहीही केलेले नाही. जर दुसरी सामाजिक बांधिलकी असणारी संस्था येथे समाज विकासासाठी काम करते, तर जिंदालला ते करायचे नाही असेच दिसते. या जिंदालने तलासरी, मोखाडा याठिकाणी जाऊन का काम केले नाही.

येथे जनसुनावणीसाठी लोकप्रतिनीधी - आमदार, खासदार उपस्थित असणे गरजेचे होते. तर जिंदाल प्रकल्प २-३ वर्षे सामाजिक बांधिलकी पाळतो का हे पाहावे व नंतर जनसुनावणी आयोजित करावी. जर तसे जिंदाल करत नसेल, तर त्यास या जिल्ह्यातून हद्दपार करण्यात यावे.

५९) **<u>कुमार गुरु सुरेश ठाकूर, राहणार-मुरबे गाव, तालुका, जिल्हा-पालघरः-</u>**

सर्वच गोष्टी मान्यवरांनी सांगितलेल्या आहेत. तर मी भूमीपुत्र म्हणून सांगू इच्छितो की जर प्रकल्प मुरब्याला होणार आहे, तर जनसुनावणी पालघरला का आयोजित करण्यात

आली?जेथे प्रकल्प बांधणार आहेत, तेथे कांदळवन आहेत. मॅंग्रोसची झाडे कापली, तर त्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येतो. तर आपण जिंदाल बंदरावर कुठला गुन्हा दाखल करणार आहेत?

६०) **<u>स्थानिक ग्रामस्थ नागरीक, ता. जि. पालघर</u>**

बोईसर परिसरात शासनाच्या वतीने तारापूर एमआयडीसी सारखे शासकीय, किंवा भांडवलदारांचे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले. सदर प्रकल्पाचे दुःष्परिणाम किनारपट्टीवर राहणा-या कोळी समाजाला भोगावे लागत आहेत. खाडी, समुद्र प्रदूषित झालेले आहेत. अनेक माशांच्या प्रजाती या नष्ट झाल्या व होण्याच्या मार्गावर आहेत. तसेच मच्छि खाणा-यांना प्रदूषणामुळे कॅन्सर सारखे आजार होत आहेत. स्थानिक कोळ्यांचा मच्छिमारीचा व्यवसाय हा नष्ट होत आहे. जिंदालच्या या प्रकल्पामुळे भायंदर ते डहाणू पर्यंत मच्छिमारी नष्ट होईल. मच्छिमार व्यवसाय हा संपुष्टात येणार आहे. त्यामुळे जिंदाल मुरबे प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये.

मच्छिमार म्हणजे शेतकरीच आहे. करेल त्याची जमिन या न्यायाने जो मच्छीमारी करतो, त्यास वहिवाटीच्या नियमाप्रमाणे मच्छिमार कोळीस शेतक-यांप्रमाणे न्याय द्यावा.

मच्छिमारी कोळी हा आदिवासी समाजच आहे. दिवासी याची व्याख्याच आमच्या कोळी समाजाला माहित नाही. आदिवासी म्हणजे एकाच जागी हजारो वर्षे स्थायिक झालेला. मच्छिमारी कोळ्यांची वेगळी संस्कृती आहे. तरी मच्छिमारी कोळीला आदिवासी समाजाचा दर्जा देण्यात यावा.

६१) **<u>श्री रुपेश रामदास संखे, अध्यक्ष, पर्यावरण उत्कर्ष संस्था, पालघर-</u>**

जेटी झाल्यानंतर बाहेरिल १९० एकर जागा ही रेल्वे यार्ड, कॉरिडॉर यासाठी अधिग्रहित करण्यात येणार आहे. तर २७० हेक्टर जागा ही माल साठविण्यासाठी अधिग्रहित करण्यात येणार आहे. एकूण ५५० एकर जागा या जेएसड्ब्लु पोर्टसाठी वापरली जाणार आहे.

तर ५५० एकर जागेतील जेवढी झाडे आहेत, ती कापली जाणार आहेत. सामान्य माणसाने झाड तोडले, तर दहा हजार दंड किंवा मनुष्यवधाचा गुन्हा लावण्यात येतो. तर कंपनी लाखो झाडे तोडणार आहे, त्याबाबत काहीही तरतुद नाही. पूर्वी पालघर ते बोईसर येथे १५०-२०० वर्षांची झाडे होती. ती नविन रस्ता करताना तोडली आणि आता तेथे एकही झाड नाही.

तर सर्वसामान्य माणसांना जो नियम आहे, तो शासकीय यंत्रणेला लागू होत नाही का?

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जनसुनावणी कार्यान्वित असलेल्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविण्याची सुचना केली.

६२) **श्री चिराग राऊत, राहणार-मुरबे, तालुका, जिल्हा-पालघरः-**

करोना काळात सर्व बंद असताना फक्त एकच मार्ग जगण्याचा होता, समुद्र, खाडी येथील मासे. जर प्रकल्पामुळे मासेमारी नष्ट झाली, तर भूमीपुत्र काय काम करणार?

६३) **श्री दीपक भंडारी, वडराई, आगरी संघर्ष समिति-**

त्यांनी जनसुनावणी नोटीस बोर्डवरिल नावाबाबत सूचना केली. प्रकल्पासमोर प्रस्तावित असावे ही सूचना केली.

त्यांनी चर्चेनुसार joint project कोणाबरोबर अशी विचारणा केली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की सुरवातीस ही माहिती सांगण्यात आलेली आहे. ती आपणास देण्यात येईल.

६४) **श्री सुजय मोरे, वडराई, जिल्हा-पालघरः-**

वरिल चर्चेस अनुसरुन त्यांनी मत मांडले की आपण माहिती नाकारु शकत नाही. त्यांनी ईआयए मधील निर्देश सांगितले.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले. ही समिती निर्णय घेत नाही, प्रकल्प मंजूर करत नाही किंवा प्रकल्प नाकारत नाही. सर्व दस्तावेज हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली याना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थितांनी अतिशय चांगले मुद्दे मांडले. पण याबाबत काही स्पष्टीकरण हवे असल्यास प्रकल्प प्रवर्तक व एमएमबी अधिकारी आपणास त्याबाबत स्पष्टीकरण देतील.

६५) **श्री दीपक भंडारी, वडराई, आगरी संघर्ष समिती-**

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण आपले मुद्दे मांडावेत. कुठलाही उद्रेक करु नये. अहवालात त्रुटी असतील त्या दुरुस्त करण्यासाठीच ही जनसुनावणी आहे.

श्री भंडारी यांनी म.प्र.नि मंडळाचया कार्यशैलीवर टीका केली.

६६) **<u>श्री सुजय मोरे, वडराई, जिल्हा-पालघरः-</u>**

विचारणा केली की शेवटी प्रकल्प प्रवर्तक उत्तर देणार का, त्यास अध्यक्षा यांनी होकार दिला.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण सल्लागार हे स्पष्टीकरण देतील. Cross Questions will not be allowed.

श्री सुजय मोरे यांनी बैठकीच्या कालावधीबाबत विचारणा केली.

श्री सुजय मोरे यांनी सीआरझेड बाबत स्पष्टीकरण विचारले.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी during the clarification answer will be given

६७) **<u>श्री चंद्रकांत तरे, अध्यक्ष, सातपाटी मच्छिमार सोसायटीः-</u>**

सर्वांनी सांगितले की ईआयए अहवाल खोटा आहे व जनसुनावणी बेकायदेशीर आहे असे सर्वांनी बैठकीत सांगितलेले आहे. मात्र बाधित गावांनी प्रकल्पाच्या विरुध्द ठराव मंजूर करुन आपणास सादर केलेले आहेत. मात्र त्याचा विचार न करता आपण जनसुनावणी आयोजन केलेले आहे. तरी जनभावनेनुसार सदरहू प्रकल्पास मान्यता देऊ नये असा अहवाल आपण शासनास सादर करावा.

६८) **<u>श्री शैलैज चंद्रकांत पवार, राहणार-</u>**

प्रकल्प विकसित करताना जो भराव टाकणार आहेत, त्यामुळे खाडीचे पाणी हे गावात जाणार आहे. शेती बाधित होणार आहे. मच्छिमार व शेतकरी देशोधडीला लागतील, म्हणून जिंदाल बंदर होऊ नये.

६९) **<u>एडव्होकेट पाटीलः-</u>**

आपण किती वेळा प्रकल्प स्थानावर भेट दिली. आपण बघावे की आम्ही निरोगी आयुष्य जगत आहे. जिंदालमुळे आमचे आनंदी जीवन उध्वस्त आपण करु नये. प्रकल्पास विरोध.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना बराच वेळ चर्चा चालू आहे, तर संक्षिप्त सूचना, हरकती मांडण्याची सूचना केली.

७०) **श्री भूपेन्द्र राऊत, डहाणूः-**

वेगळ्या विषयावर बोलू लागले.

त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विषयावर संक्षिप्त बोलण्याची सूचना केली.

७१) **स्थानिक ग्रामस्थ नागरीक, ता. जि. पालघर**

एक प्रश्न जनतेस व एक व्यासपीठाला आहे.

जनेतस प्रश्न - या जनसुनावणीस आपला एकही लोकप्रतिनिधी उपस्थित नाही, यावरुन त्यांचा हेतू स्पष्ट होतो.

व्यासपीठास प्रश्न - बैठकीत एकही माणूस प्रकल्प हवा असे म्हणत नाही. तरी आपण जनभावना लक्षात घेऊन प्रकल्पास मान्यता देऊ नये असा अहवाल सादर करावा.

७२) **श्री दीपक राऊत, ता. जि. पालघर -**

आधि मी जनसुनावणी रद्द व्हावी म्हणून मी विचार मांडले. २०१२ साली मांडलेले सर्व मुद्दे उपस्थितांनी मांडलेले आहेत. आम्ही उपस्थित केलेले सर्व मुद्दे हे अहवालात यावेत. तरी बैठकीचे इतिवृत्त व व्हिडिओ रेकॉर्डिंग प्रत उपलब्ध करण्यात यावी.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचनांची नोंद घेतल्याचे सांगितले.

७३) **श्री. विनोद पाटील, अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र कृती समिती, पालघर -**

टीओआर अटी - प्रकल्प प्रवर्तक यांनी सादर केलेला मुळ मजकूर त्यातील कमतरता याबाबत हरकत नोंदविली.

भौतिक मॉडेल CWPRS कडून का करण्यात आले नाही.

भरावामुळे किना-यावरिल गाळावर काय परिणाम होईल?

स्थानिक मच्छिमार समाजावर होणारा सामाजिक, आर्थिक परिणाम.

मासेमारी क्षेत्रबाबत माहिती नाही.

Soil erosion of seashore बाबत शास्त्रीय अभ्यास नाही.

अध्यक्षा यांनी सूचनांची नोंद घेतल्याचे सांगितले.

७४) **<u>श्री भूपेन्द्र राऊत, डहाणूः-</u>**

त्यांनी मत मांडले की पर्यावरणावर बोलायचे होते.

अध्यक्षा यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, हरकती उपस्थित करण्यात याव्यात.

श्री राऊत यांनी मत मांडले की हा पेसा जिल्हा आहे, मच्छिमारी मोठ्या प्रमाणात आहे. प्रदूषणामुळे ती धोक्यात येऊ नये. खेड्यामध्ये स्वयंरोजगार उत्पन्न व्हावेत.

अध्यक्षा यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

७५) **<u>स्थानिक ग्रामस्थ नागरीक, ता. जि. पालघर</u>**

प्रकल्प रोज ५०,००० लिटर्स पाणी वापरणार आहे. तर वर्षाचा हिशोब केल्यास एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी कंपनी वाया घालविणार आहे.

समुद्रामधील जैव-विविधतेचा अहवालात उल्लेख नाही.

७६) **<u>श्री. अभिजित तरे, सातपाटी उपसरपंच-</u>**

पावसाळ्यात आमच्या गावातील घरे वाहून गेली. प्रस्तावित प्रकल्पासाठी भराव व ब्रेक वॉटर वॉल बांधल्यामुळे खाडी नष्ट होईल आणी गावातील घरे वाहून जातील.

अध्यक्ष यांनी सूचना केली की आपण लोकप्रतिनिधी आहात, फक्त मुद्द्यांवरच बोला.

७७) **<u>श्री. सातपटे, राहणार-सातपाटी रहिवाशीः-</u>**

त्यांनी मुद्दे उपस्थित केले ते पुर्वी केलेले होते.

अध्यक्षा यांनी परत तेच तेच मुद्दे न बोलण्याची सूचना केली. अध्यक्षा यांनी सुचनेची नोंद घेतल्याचे सांगितले.

७८) **स्थानिक ग्रामस्थ नागरीक, ता. जि. पालघर**

त्यांनी उपस्थितांना प्रकल्पाच्या विरुध्द असणा-यांनी हात वर करण्याची सूचना केली. सर्वांनी हात वर केले.

त्यांनी विनंती केली की कोणाचाही प्रकल्पास पाठिंबा नाही.

७९) **वडराई मच्छिमार सोसायटीचा चेअरमन** श्री

माझ्या गावात ५० बोटी आहेत. मात्र आम्हाला या जनसुनावणीबाबत काहीही कळविलेले नाही. बंदरात ५,००० लोक मासेमारीवर अवलंबून आहेत. १० कि.मी. भिंतीमुळे ५,००० लोकांवर उपाशी राहण्याची पाळी येणार कारण आम्ही प्रवाहाबरोबर मासेमारी करतो. त्यांनी उपस्थितांना रस्त्यावर लढाईची तयारी करण्याची सूचना केली.

८०) **श्री तांडेल, अध्यक्ष, मच्छिमार सोसायटी**

जरी पंतप्रधान उद्घाटन करुन गेले, तरी वाढवणची लढाई चालू आहे. २८ ऑक्टोबर पर्यंत स्टे आहे. मुरबे बंदर कदापि होणार नाही.

अध्यक्षा यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

८१) **स्थानिक ग्रामस्थ नागरीक, ता. जि. पालघर**

त्यांनी कोर्टात लढणार असल्याची माहिती दिली.

अध्यक्षा यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

८२) **रुपाली सचिन पाटील,ग्रामपंचायत सदस्य-**

मी शेतकरी आहे. येथे सर्वांनीच प्रकल्पास विरोध केलेला आहे. तरी याची नोंद घेण्यात यावी की जनसुनावणीस विरोध आहे.

८३) **श्री. देवेन्द्र भारत देव, राहणार-मुरबे**

प्रकल्पास विरोध आहे.

८४) **श्री. चंदन म्हात्रे, मुरबे**

प्रकल्पास विरोध आहे.

८६) **श्री. प्रशांत यशवंत तरे**

जनता जागरुक झालेली आहे. तरी प्रकल्प अधिका-यांना मुरबेला पाठवू नका.

**८७) नांदगाव ग्रामस्थ**

कुठल्याही प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य का देण्यात येत नाही. स्थानिकांना प्राधान्य आहे का?

८८) **श्री. संतोष गावंड, राहणार-नांदगाव,**

येते आठ-दहा हजार लोक उपस्थित आहेत. फक्त १०० लोकांनी विरोध दर्शविला आहे.

अध्यक्षा यांनी सूचना लेखी स्वरुपात देण्यास सांगितले.

**८९) सौ.नमिता तरे, ग्रामपंचायत सदस्य, मुरबे**

जिंदाल बंदरास सर्वांचा विरोध आहे. याची नोंद घ्यावी. कंपन्या आल्या, त्याचबरोबर प्रदूषण वाढले. गेल्या वीस वर्षात कॅन्सरचे प्रमाण वाढलेले आहे. जगातील एक मोठ्या बंदरापैकी वाढवण बंदर असताना मुरबे बंदराची गरज नाही.

९०) **श्री प्रशांत कृष्ण तरे, ग्रामपंचायत सदस्य, मुरबे**

सर्वांनीच सांगितले की ही जनसुनावणी बेकायदेशीर आहे, त्या मतावर मी ठाम आहे. मुरबेच्या जवळील जेएनपिटी १,२५,००००० कन्टेनर हाताळणी करणार आहे. भारताची जीडीपी ५.६ आहे. जर मुरबे ऐवजी भारताच्या संरक्षणाचा प्रकल्प असता तर आम्ही आमची घरे दान दिली असती. आम्ही लढा देऊन जिंदाल बंदर रद्द करु.

९१) **श्री. वृषभ प्रशांत तरे, मुरबे**

मुरबे बंदरास कडकडीत विरोध आहे.

९२) **श्री. मिथिल अशोक तरे, मुरबेः-**

मुरबे बंदरास कडकडीत विरोध आहे.

अध्यक्षा यांनी शांततेने मत मांडण्याची सूचना केली.

९३) **श्री. धीरज सुभाष तामोरे-**

जनसुनावणी सुरु होताना किती हरकती होत्या व आता किती आहेत. तसेच बैठकीस किती लोक आलेत?

अध्यक्षा यांनी शेवटी सांगणार आहोत असे सांगितले.

९४) **श्री प्रशांत नाईक, राहणार-खारेकुरण, मच्छिमार संघ अध्यक्ष-**

जरी आपण बाधित ग्रामपंचायतीस ईआयए अहवाल दिला, पण कुठल्याच मच्छिमार संघांना आपण तो दिलेला नाही. अहवालात पान क्रमांक १३८ पालघरची लोकसंख्या २००१ मध्ये लोकसंख्या १,१०,७०१ होती आणी २०४१ मध्ये ती ९,६७,०४१ असेल असे दिलेली आहे. म्हणजे ग्रामीण भागात लोकसंख्या वाढणार नाही का याचा खुलासा करावा.

प्रकल्पामुळे जी बाधित गावे होणार आहेत - त्या गावाच्या लोकसंख्येत तफावत दिसते. खुलासा करण्यात यावा.

येथे बैठकीत प्रत्येकाने विरोध दर्शविलेला आहे. त्याची नोंद घेऊन ती भारत सरकारला सादर करावीत ही विनंती.

९५) **श्री शैलेश राऊत, मुरबे:-**

सर्वांनीच विरोध दर्शविलेला आहे. तर अहवालात समुद्रात जे सर्वेक्षण दाखविले ते केव्हा व कसे केले? सर्वेक्षण केल्याची तारीख सांगावी, फिल्ड सर्वेक्षण कोणाच्या व कोणत्या बोटीतून केले, कोणाची पुर्वपरवानगी घेतली याची माहिती देण्यात यावी.

याबाबत आणि सामाजिक परिस्थितीबाबत जे सर्वेक्षण केले, ते कोणाबरोबर केले त्याची माहिती द्यावी.

अध्यक्षा यांनी सांगितले की सुरवातीस सादरीकरणात माहिती देण्यात आलेली आहे. तरीसुध्दा आपण याबाबत लेखी सूचना द्यावी, आम्ही त्याची नोंद घेणार असून संबधित शासकीय विभागास त्याबाबत माहिती देण्यास सांगण्यात येईल.

श्री शैलेश राऊत यांनी आरोप केली की सर्वेक्षणाची माहिती खोटी आहे.

अध्यक्षा यांनी सांगितले की सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. आता दुस-या वक्त्यांना माईक देण्यात यावा.

९६) **स्थानिक ग्रामस्थ नागरीक, ता. जि. पालघर**

बंदराबाबत सर्वांनीच हरकती घेतलेल्या आहेत. पालघर जिल्ह्यात, समुद्रकिनारा क्षेत्र १२० किमी क्षेत्रात पसरलेले आहे. येथे २४ मत्स्यव्यवसाय संस्था आणि ३२ सहकारी संस्था आहेत.

सातपाटी हे महाराष्ट्रातील पहिले बंदर. मुंबईच्या उत्तरेला डहाणूपर्यंत मोठे मासे मिळतात. मच्छमारीबाबतची कुठल्याही शासकीय विभागाचा अहवाल नाही. येथील मच्छिमारी देशाल कोट्यावधी रुपयांचे चलन मिळून देते. तर जिंदाल सारखे बंदर येथे आणणे हे घातक आहे. समुद्र दीड कि.मी. मागे जात आहे, याबाबत शास्त्रीय अभ्यास का केला नाही? अहवालात अनेक त्रुटी आहेत. बंदराला विरोध आहे.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जेएसडबल्युचे पर्यावरण सल्लागार पुढील माहिती देत आहेत, ते शांततेने ऐकावे.

९७) **श्री राहूल रघुनाथ राऊत, मुरबे-**

बंदर म्हटले की अनेक जहाजे येणार, त्यापासून प्रदूषण होणार. तर एक जहाज किती प्रदूषण करते याचे उत्तर द्यावे.

अध्यक्ष यांनी मुद्दा मांडण्याची सूचना केली.

श्री. राऊत यानी प्रकल्पास विरोध केला. त्यांनी गार्डियन वृत्तपत्रातील माहितीनुसार कारगो/ जहाज रोज जे प्रदूषण करते त्याचा अभ्यास करणे जरुरीचे आहे असे मत सांगितले.

९८) **श्री मंदार देव, मुरबे ग्रामस्थः**

बंदरासाठी ड्रेजिंग करणार का, तेथे काळा दगड आहे, तो फोडण्यास आपण स्फोट करणार का? ड्रेजिंगची खोली किती असेल? भरावाचे मटेरियल कोठून आणणार आहात. त्याचे

जीपीएस लोकेशन द्यावे. तसेच प्रकल्प प्रवर्तक कांदळवन तोडणार,तर त्यांच्यावर अजामीनपत्र गुन्हा लावणार का. शुध्द पाणी, शुध्द हवा हा सर्वांचाच हक्क आहे.

आमचा या जनसुनावणीस, प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.

99) **श्री जयेश गावंड:-**

प्रस्तावित प्रकल्पामुळे आमचा विनाश होणार आहे. मासेमारी संपणार आहे. आमचा या बंदरास कायम विरोध राहिल. पोलिसांच्या हस्तक्षेपाने आम्ही जलसमाधी पुढे ढकलली, मात्र प्रकल्प लादता तर आम्ही आत्मदहन करु.

पर्यावरण सल्लागार यांनी माहिती सांगण्यास सुरवात केली. मात्र उपस्थितांनी केलेल्या गोंधळामुळे ते संपूर्ण माहिती सांगू शकले नाही.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जनसुनावणची वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रकाशित केल्यानंतर आजपर्यंत 8,000 सूचना/निवेदने/हरकती प्राप्त झालेल्या आहे. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पास प्रदान करण्यात आलेला टीओआर, जैवविविधता,आरोग्यास धोका व सुरक्षितता या मुद्यांवर सूचना, हरकती नोंदविल्या आहेत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना आवाहन केले की कोणाला सूचना, आक्षेप नोंदवायचे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की येथे ज्या सूचना,आक्षेप नोंदविण्यात आले, त्याची नोद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल.

अध्यक्षा ,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षा यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

जनसुनावणीची प्रक्रिया दरम्यान प्राप्त झालेले एकूण 8980 सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(विरेन्द्र सिंह)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-2,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
बोईसर (पश्चिम),
तालुका, जिल्हा-पालघर

**(किरण हसबनीस)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
ठाणे

**(डॉ. इंदु राणी जाखड, भाप्रसे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
जिल्हादंडाधिकारी,पालघर,
जिल्हा – पालघर